# महाराष्ट्र विधानसभा

## तिसरे अधिवेशन, २०१८

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**ठाणे आणि पालघर जिल्यातील रासायनिक कंपन्यामध्ये आग लागण्यांच्या घटनांमध्ये वाढ झाल्याबाबत**

**(१) ६११९९ (२२-०८-२०१६). श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.विलास तरे (बोईसर), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.अमित घोडा (पालघर) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे आणि पालघर जिल्हयात अनेक रासायनिक कंपन्या ठिकठिकाणी असून त्यात वारंवार होणारे स्फोट आणि लागणाऱ्या आगीचे प्रमाण वाढत असल्याने माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच भिवंडी शहर आणि परिसरात हजारो बेकायदा गोदामे असून त्यात लाखो लीटर रसायनाचा व ज्वालाग्रही पदार्थांचा साठा करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनामार्फत चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार पुढे ठाणे व पालघर जिल्हा रासायनिक कंपन्या तसेच रासायनिक साठ्याच्या गोदामापासून सदर जिल्हे सुरक्षित राहावे म्हणून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (०३-११-२०१८) :**(१) हे खरे नाही,

(२) हे खरे नाही,

(३) प्रश्न उद्भवत नाही,

(४) प्रश्न उद्भवत नाही.

तथापि, भिवंडी गटातील ग्रामीण भागामध्ये ५४ गोदामांकरिता रासायनिक पदार्थांचा साठा करणे करिता ग्रामीण भागामध्ये ग्रामपंचायतीकडून ना हरकत दाखला दिला जातो. तसेच पंचायत समिती, भिवंडी यांच्याकडून ग्रामपंचायत हद्दीतील बांधण्यात आलेल्या

गोदामांमध्ये ज्वलनशील व धोकादायक पदार्थांचा साठा ठेवल्यास यामुळे आग लागून जिवितहानी व वित्तहानी होवू शकते याकरिता दक्षता घेण्याबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत. तसेच प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण कल्याण मंडळ कार्यालय,कल्याण,जि.ठाणे कार्यालयामार्फत गोदाम/वेअर हाऊसची पाहणी करण्यात येवून पाहणी दरम्यान विना परवाना आढळून आलेल्या रासायनिक गोदामधारकांना/ उद्योजकांना ताकिद सुचना देण्यात आलेल्या आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**खेड-शिवापूर टोल नाक्यावरील (ता.जि.पुणे) कर्मचा-यांच्या मनमानी कारभाराबाबत**

**(२) ८१५५० (२१-०४-२०१७). श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खेड-शिवापूर टोल नाक्यावर (ता.जि.पुणे) येथील स्थानिक पोलीसांच्या मदतीने सुरु असलेल्या कर्मचा-यांच्या मनमानी कारभारावर नियंत्रण ठेवण्याकरिता रहिवाशांना असलेल्या सवलतीबाबत नियम असलेला फलक आणि कागदपत्रांची माहिती ठळक अक्षरात लावण्याची मागणी नजीकच्या गावांसह कात्रज परिसरातील नागरिकांनी केली असल्याचे दिनांक २३ जानेवारी, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त टोलनाक्यावरील कर्मचारी अर्वाच्च भाषा वापरुन वाहनचालकांना वाईट वागणूक देवून मनमानी कारभार करित असल्याची तक्रार करुनही स्थानिक पोलीस याकडे दुर्लक्ष करीत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-११-२०१८) :**

(१) व (२) हे खरे नाही.

मनमानी कारभारावर नियंत्रण ठेवण्याकरिता रहिवाशांना असलेल्या सवलतीबाबत नियम असलेला फलक आणि कागदपत्रांची माहिती ठळक अक्षरात लावण्याची मागणी करणारा अर्ज नजीकच्या गावांसह कात्रज परिसरातील नागरिकांनी केली असल्याबाबत राजगड पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण येथे अथवा पोलीस आयुक्त पुणे शहर कार्यक्षेत्रातील भारती विद्यापीठ पोलीस स्टेशनकडे दाखल नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात आधार केंद्रे सुरु करण्याबाबत**

**(३) ८९६७४ (०४-०९-२०१७). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी), श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सर्व शासकीय योजनांसाठी राज्य शासनामार्फत आधार हे सक्तीचे करण्यात येऊनही काही तांत्रिक कारणे देऊन माहे एप्रिल, २०१७ पासून आधार केंद्रे बंद करण्यात आल्याने ठाणे जिल्ह्यातील सुमारे साडेसात लाख नागरिक आधार नोंदणीपासून वंचित राहिल्याचे जिल्हाधिकारी,ठाणे यांनी माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान दिलेल्या माहितीनुसार निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच पुणे जिल्ह्यात आधार नोंदणीचे चार कंपन्यांना दिलेले काम शासनाने काढून घेतल्यामुळे सध्या आधार नोंदीचे काम पूर्णपणे बंद पडले असल्याचे माहे जून २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, अशा प्रकारे तांत्रिक कारणे देऊन आधार केंद्रे बंद केल्यामुळे राज्यातील शालेय विद्यार्थ्यांपासून वयोवृध्द नागरिकांना मोठ्या समस्यांना सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त दोन्ही प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार राज्यातील आधार केंद्रे सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे व याबाबतची सद्यस्थिती काय आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-११-२०१८) : (**१)होय, हे खरे आहे.माहे मे-जून २०१७ च्या सुमारास ठाणे जिल्ह्यात, आधार एनरोलमेंट ऐजन्सी म्हणून काम करणा-या संस्थेकडून आधार नोंदणीचे काम काढून घेण्यात येऊन ते महाऑनलाईन या शासनाच्या अख्यारीतील संस्थेला देण्याचा निर्णय घेण्यात आल्याने आधार नोंदणीच्या कामाच्या हस्तातरणांचा कालावधीत (migration period) आधार नोंदणीचे काम बंद होते.

(२) हे खरे नाही. पुणे जिल्ह्यात आधार नोंदणीचे काम माहे जून, २०१७ मध्ये सुरु होते.

(३) हे खरे नाही.केंद्र चालकाकडे online विनंती अर्ज केल्यास आधार केंद्र चालक जेष्ठ नागरिकांच्या निवासस्थानी जाऊन आधार कार्ड काढण्यात येते तसेच विद्यार्थ्यांनसाठी आधार कार्ड काढण्यासाठी शिबीरांचे आयोजन करण्यात येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे शहर पोलीस वाहतूक मुख्यालयाकरिता नवीन प्रशासकीय इमारत बांधण्याबाबत**

**(४) ९१७१६ (०४-०९-२०१७). श्री.विजय काळे (शिवाजीनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरातील वाढत्या लोकसंख्या व वाढत्या वाहन संख्याच्या अनुषंगाने वाहतूक नियोजन व व्यवस्थापन करण्यासाठी पुण्यातील औंध येथे पुणे शहर पोलीस वाहतूक मुख्यालयाकरिता नवीन प्रशासकीय इमारतीसाठी सुमारे ७ कोटी रुपयांचा प्रस्ताव तत्कालीन पोलीस आयुक्तांच्या वतीने सादर करण्यात आला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्ताव मान्य होण्यासाठी अपर पोलीस महासंचालक (नि व स ) व शिवाजीनगर वि.स.स. यांच्यावतीने माहे मार्च २०१५ पासून लेखी पत्राद्वारे पाठपुरावा करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर पुणे शहर पोलीस वाहतूक मुख्यालयाकरीता नवीन प्रशासकीय इमारत बांधण्यासाठी प्रशासकीय मान्यता व निधी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-११-२०१८) :**

(१) व (२) हे खरे आहे.

(३) पुणे शहर वाहतूक मुख्यालयाकरिता नवीन प्रशासकीय इमारत बांधणेबाबतचा प्रकल्प महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळामार्फत हाती घेण्यात आला आहे. सदर प्रकल्प नियोजन स्तरावर असून आराखडा नकाशे बनविण्याचे काम सुरु आहे. या प्रकल्पाच्या नियोजनासाठी मे.सम्यक सी २ इन्फ्रा, पुणे यांची प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून नेमणूक केलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रामटेक, पारशिवनी, मोहोदा, (ता.जि. नागपूर) येथील सन १९७५ च्या आणीबाणीतील मीसाबंदीना व सत्याग्रही यांना सानुग्रह अनुदान मिळण्याबाबत**

**(५) ९२०३७ (०४-०९-२०१७). श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रामटेक, पारशिवनी, मोहोदा, (ता.जि. नागपूर) येथील सन १९७५ च्या आणीबाणीतील मीसाबंदीना व सत्याग्रही यांना सानुग्रह अनुदान मिळण्याबाबतचे निवेदन मीसाबंदी व सत्याग्रही यांनी मा. मुख्यमंत्री, यांना दिनांक २७ जून, २०१७ रोजी वा त्यासुमारास दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-११-२०१८) : (**१) असे निवेदन प्राप्त झाले नाही.
(२) सन १९७५ ते १९७७ मधील आणिबाणीच्या कालावधीत लोकशाहीकरिता लढा देणा-या ज्या व्यक्तींना बंदीवास सोसावा लागला अशा व्यक्तींचा सन्मान/ यथोचित गौरव करण्यासंबंधी दि. ०३ जुलै, २०१८ च्या शासन निर्णय क्रमांक निवृवे-१०१५/प्र.क्र. २६१/२०१५(२०१८)/स्वासैक-१ नुसार धोरण ठरविण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही

---

**वाशी (नवी मुंबई) येथून अपहरण झालेल्या तरुणाचा मृतदेह आंध्रप्रदेशात सापडल्याबाबत**

**(६) ९४९४४ (१३-१०-२०१७). श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वाशी (नवी मुंबई) येथून अपहरण झालेल्या श्री. शीलवंत सोनकटले या २६ वर्षीय तरुणाचा मृतदेह आंध्रप्रदेश येथील विजयवाडा येथे आढळला असल्याचे दिनांक १४ ऑगस्ट, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अपहरण झाल्याच्या दुसऱ्याच दिवशी शीलवंत याने मित्राच्या मोबाईलवर अपहरण झाल्याबाबतचा संदेश पाठवला होता , हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,
(४) असल्यास, अपहरण कोणी व कशासाठी केले याबाबत चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-११-२०१८) :**
(१), (२), (३) व (४)

श्री. शीलवंत सोनकटले याच्या मोबाईलवरून त्यास किडनॅप केले अशा आशयाच्या आलेल्या मेसेजवरून त्यास अज्ञात व्यक्तीने पळवून नेले असावे असा संशयावरून फिर्यादीने अज्ञात इसमाविरूद्ध केलेल्या तक्रारीनुसार वाशी पोलीस ठाणे येथे गु.र.नं. ३०३/१७ भादंवि कलम ३६३, ३८५ अन्वये दि. ९.८.२०१७ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला.

सदर प्रकरणी शीलवंत सोनकटले यांच्या मृत्यू संदर्भात भवानीपूरम पोलीस ठाणे येथे अकस्मात मृत्यू रजि नं. ४६४/२०१७ सी.आर.पी.सी. १७४ अन्वये दाखल केला असून सदर मृत्यूच्या अनुषंगाने वैद्यकीय अधिकारी यांनी मृत्यूचे कारण Asphyxia as a result of antemortem drowning असे दिले आहे. तसेच श्री. शीलवंत सोनटकले यांना मायग्रेनचा आजार होता त्यासाठी त्यांचेवर डॉक्टरांचे उपचार चालू होते. उपचारात त्यांना नैराश्याबाबत औषधे दिली जात होती ही बाब तपासात समोर आली आहे. यावरून मयत शीलवंत सोनटकले यांनी स्वत: कृष्णा नदीच्या पाण्यात उडी मारून आत्महत्या केली असावी असे तपासात निदर्शनास आले आहे.

सदर प्रकरणी क फायनल मा. न्यायालयात सादर केला आहे .
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जळगांव महानगरपालिका विमानतळ विकास योजनेत झालेला अपहार**

**(७) १०१५७८ (०६-०१-२०१८). श्री.एकनाथराव खडसे (मुक्ताईनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जळगांव महानगरपालिका विमानतळ विकास योजनेत झालेल्या अपहारासंदर्भात जळगांव शहर पोलीस स्टेशनला दिनांक २९ ऑक्टोबर, २०१२ रोजी वा त्यासुमारास गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर गुन्ह्याचे स्वरुप काय आहे,
(३) असल्यास, सदर अनियमिततेसंदर्भात चौकशी करण्यात आली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीत काय निष्पन्न झाले आहे व संबंधित दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-११-२०१८) :**
(१) होय, हे खरे आहे.
(२) जळगांव नगर पालिकेच्या माध्यमातून महाराष्ट्र शासनाचे परवानगीने विमानतळ विकास योजना राबविण्यात आली आहे. सदर योजना राबविण्यात येऊन सदर योजनेमध्ये झालेल्या अपहारासंदर्भात जळगांव पोलीस स्टेशन भाग ५ येथे गु.र.नं.११०/२०१२ भादंवि ४०३, ४०६, ४०९, ४२०, ४६५, ४६८, ४७१, १२०(ब), ३४ सह ला.लु.प्र.का.क.१३(१)(क), १३ (१)(ड), १३ (२) प्रमाणे दिनांक २९.१०.२०१२ रोजी गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.
(३) व (४) सदर योजनेत झालेल्या अपहाराबाबतच्या चौकशीमध्ये नगरपालिका, जळगांव यांचे नियमबाह्य मोबिलायझेशन ॲडव्हान्स व मटेरीयल ॲडव्हान्स असें एकूण रुपये ३,१८,१५,७९७/- रुपयांचे नुकसान झाल्याचे निष्पन्न झाले आहे. सदर गुन्ह्यात झालेल्या अपहारासंबंधी व्यवहाराबाबत सनदि लेखापाल (C.A.) यांचेकडून पडताळणी करुन त्यांचे अभिप्रायासाठी प्रकरण सादर केले आहे. सदर गुन्ह्याबाबत पोलीस तपास सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**देगलूर व बिलोली या तालुक्यातील (जि.नांदेड) पोलीस उपविभागीय अधिकारी कार्यालये, पोलिस ठाणे इमारती व पोलिस कर्मचा-यांची निवासस्थाने बांधण्याबाबत**

**(८) १०२९४२ (०६-०१-२०१८). श्री.सुभाष साबणे (देगलूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्ह्यातील देगलूर व बिलोली या तालुक्यातील पोलिस उपविभागीय अधिकारी कार्यालये, पोलिस ठाणे इमारती व पोलिस कर्मचा-यांची निवासस्थाने बांधण्याबाबत लोकप्रतिनिधींच्या मागणीवरून शासनाने दिनांक ६ एप्रिल, २०१७ रोजी वा त्यासुमारास पत्रान्वये तातडीने कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या असता गृह विभागाच्या पोल -७ च्या कक्ष अधिका-यांनी जाणीवपूर्वक सदर फाईल व पत्रे गहाळ केल्याची घटना माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणाची चौकशी केली आहे काय, चौकशीचे स्वरूप काय आहे व तद्नुसार उक्त प्रकरणातील दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-११-२०१८) :**(१) हे खरे नाही. देगलूर उपविभागीय अधिकारी कार्यालय व पोलीस ठाणे देगलूर व पोलीस ठाणे मरखेल येथील प्रशासकीय इमारत, निवासस्थान बांधकामास मंजूरी व निधी उपलब्ध करून देण्याबाबतचे लोकप्रतिनिधींचे पत्र पोलीस महासंचालक कार्यालयास पाठविण्यात आले आहे.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जेएनपीटी बंदराच्या समुद्र चॅनेलची वाढविण्याकरिता समुद्रात घडविण्यात आलेल्या स्फोटाबाबत**

**(९) १०४७६४ (१७-०४-२०१८). श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जेएनपीटी बंदराच्या समुद्र चॅनेलची खोली वाढविणे आणि चौथ्या बंदराच्या उभारणीसाठी ऐतिहासिक एलिफंटा बेटावरील किना-यालगत समुद्रात स्फोट घडविण्यात येत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत घारापुरी ग्रामपंचायतीला विश्वासात घेतले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या स्फोटामुळे एलिफंटावरील लेण्यांनाही धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-११-२०१८)** :(१), (२) व (३) जवाहरलाल नेहरु बंदर विश्वस्त हे मोठे बंदर असून ते केंद्र शासनाच्या मिनिस्ट्री ऑफ शिपींग यांच्या अखत्यारीत येते. जेएनपीटीने दिलेल्या माहितीनुसार बंदराच्या प्रकल्पाबाबतची आवश्यक ती माहिती ग्रामपंचायत, घारापुरी व तेथील गावकऱ्यांना देण्यात आली आहे. तसेच, जेएनपीटी बंदराच्या चॅनेलची खोली वाढविण्याच्या कामासाठी तक्रार नसल्याबाबतचे ना-हरकत प्रमाणपत्र ग्रामपंचायत, घारापुरी यांच्याकडून घेण्यात आले आहे. समुद्रातील स्फोटाचे काम हे सीडब्ल्यूपीआरएसचे तज्ञ तसेच, मे.टीसीई आणि जेएनपीटीच्या अभियांत्रिकी टीमच्या नियंत्रण व देखरेखीखाली करण्यात येणार असल्याने याबाबत एलिफंटा बेट तसेच लेण्यांना कोणत्याही प्रकारचे नुकसान अथवा धोका निर्माण होणार नाही.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### मु.पो.कुंभवडे, (ता.राजापूर,जि.रत्नागिरी) येथे रिफायनरी विरोधात सुरु असलेल्या बैठकीत प्रकल्प समर्थक व विरोधकांमध्ये झालेली मारामारी

**(१०) १०४९५७ (०७-०४-२०१८). श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मु.पो.कुंभवडे, (ता.राजापूर, जि.रत्नागिरी) येथे रिफायनरी विरोधात सुरु असलेल्या बैठकीत प्रकल्प समर्थक व विरोधकांमध्ये मारामारी घडली असता, रिफायनरी प्रकल्प विरोधी संघर्ष संघटनेचे नेते श्री. अशोक वालम यांना दवाखान्यातून सलाइन लावलेल्या स्थितीत पोलीसांनी अटक करुन, रुग्णवाहिकेतून रुग्णालयात न नेता पोलीस गाडीतून न्यायालयात नेल्याची बाब दिनांक १६ जानेवारी २०१८ रोजी वा त्या सुमारास उघडकीस आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, रिफायनरी प्रकल्प विरोधी संघर्ष संघटनेचे कार्यकर्ते व नेते यांना नक्षलवादी समजून तशा प्रकारची वागणूक संघर्ष संघटनेच्या कार्यकर्त्यांना पोलीस देत असल्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ,
(३) असल्यास, कुंभवडे येथे प्रकल्प समर्थक व विरोधकांमध्ये झालेल्या मारहाणी प्रकरणी प्रकल्प समर्थक व विरोधक यांच्यापैकी किती व्यक्तींवर पोलीसांनी गुन्हे दाखल केले व किती व्यक्तींना अटक केली, यापैकी समर्थक किती व विरोधक किती,
(४) असल्यास, सदर प्रकरणाचा तपास पूर्ण झाला आहे काय, असल्यास तपासाचे निष्कर्ष काय आहेत व तद्नुसार पुढे कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-११-२०१८) :**
(१) हे खरे नाही. दिनांक १४ जानेवारी, २०१८ रोजी मु.पो.कुंभवडे (ता.राजापूर, जि.रत्नागिरी) येथे रिफायनरी विरोधात सुरु असलेल्या बैठकीत प्रकल्प समर्थक व विरोधकांमध्ये मारामारी

झालेल्या घटनेच्या अनुषंगाने नाटे पोलीस ठाणे गु.र.नं. ०६/२०१८ भादंवि कलम १४३,१४७,१४९,३२३,५०४, ५०६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यामध्ये श्री.अशोक वालम यांना अटक केल्यानंतर त्यांची तब्येत अचानक बिघडल्याचे सांगितल्याने पोलीसांनी त्यांना प्रथम ग्रामीण रुग्णालय, लांजा, छोटूभाई देसाई रुग्णालय, लांजा, परकार हॉस्पिटल, रत्नागिरी येथे उपचारार्थ नेले. तेथील वैद्यकिय अधिकारी यांनी श्री.वालम हे पुर्णपणे तंदुरुस्त असल्याचे प्रमाणपत्र दिल्याने त्यांना रुग्णवाहिका दिलेली नव्हती तसेच ते तंदुरुस्त असल्याने सलाईन लावण्यात आले नव्हते व त्यांना पोलीस व्हॅनमधून सुरक्षितरित्या हुजूर कोर्टात दाखल केले. सदर गुन्ह्यामध्ये एकूण ५ आरोपींना अटक करण्यात आली आहे.
(२) श्री.वालम यांना कोणीही वाईट वागणूक दिली नाही. उलट त्यांना कोणत्याही भारतीय नागरिकांना अटक केल्यानंतर देय असलेल्या सन्मानाने वागवून कायदेशीर प्रक्रिया तंतोतंत पार पाडली आहे.
(३) व (४) कुंभवडे येथे प्रकल्प समर्थक व विरोधकांमध्ये झालेल्या मारहाणी प्रकरणी नाटे पोलीस ठाणे गु.र.नं. ०७/२०१८ भादंवि कलम ३२४,३२३, ५०४,५०६,३४ मध्ये ३ आरोपींना अटक करण्यात आली आहे. तसेच जिल्हाधिकारी रत्नागिरी यांनी मु.पो.का.क. ३७(३)(१) प्रमाणे जारी केलेल्या आदेशाचे आरोपी यांनी उल्लंघन केल्याने नाटे पोलीस ठाणे गुरनं ०८/२०१८ नुसार गुन्हा दाखल केला असून सदर गुन्ह्यामध्ये १७ आरोपींना अटक करण्यात आली आहे. सदरहू दोन्ही प्रकरणांमध्ये दोषारोपपत्र दाखल करण्यात आले असून सदर गुन्हे न्यायप्रविष्ठ आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**डीएसके उद्योग समुहाने केलेल्या फसवणूकी संदर्भात कोल्हापूर येथे दाखल झालेले गुन्हे पुणे किंवा मुंबई आर्थिक गुन्हे विभागाकडे वर्ग करणेबाबत**

**(११) १०५६८४ (०७-०४-२०१८). श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे येथील डीएसके समूहाचे संचालक श्री.दीपक सखाराम कुलकर्णी, श्रीमती हेमंती दीपक कुलकर्णी व श्री.शिरीष दीपक कुलकर्णी यांच्याविरोधात गुंतवणूक धारकांनी महाराष्ट्रातील विविध पोलीस ठाण्यासह कोल्हापूर येथे फसवणुकीचे गुन्हे दाखल केले आहेत, हे खरे आहेत काय,
(२) असल्यास, सदर गुन्ह्याचे स्वरूप व व्याप्ती मोठी असल्याने कोल्हापूर वगळता इतर सर्व ठिकाणच्या गुन्ह्याचा तपास आर्थिक गुन्हे विभाग, मुंबई व आर्थिक गुन्हे विभाग, पुणे यांच्याकडे वर्ग करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कोल्हापूर येथे दाखल झालेले गुन्हे पुणे किंवा मुंबई आर्थिक गुन्हे विभागाकडे वर्ग करणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा. मुख्यमंत्री महोदयांकडे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-११-२०१८) :** (१) हे खरे आहे.

पुणे येथील डिएसके समूहाचे संचालक यांचे विरुध्द मुंबई, पुणे, कोल्हापूर व सांगली येथे गुन्हे दाखल आहेत.

(२) हे खरे नाही.

आर्थिक गुन्हे शाखा, पुणे शहर यांचेकडे इतर कोणत्याही ठिकाणचे गुन्हे वर्ग करण्यात आलेले नाहीत.

(३) होय, हे खरे आहे.

(४) कोल्हापूर येथे दाखल गुन्ह्याचा तपास आर्थिक गुन्हे शाखा, कोल्हापूर यांच्याकडून लवकरात लवकर पुर्ण करण्याबाबत आर्थिक गुन्हे शाखा, कोल्हापूर यांना सूचना देण्यात आल्या आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## रायगड जिल्ह्यातील सामाजिक व राजकीय कार्यकर्त्यां विरोधात दाखल केलेले व सध्या प्रलंबित असलेले खटले मागे घेण्याबाबत

**(१२) १०६४८९ (०७-०४-२०१८). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), अॅड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्ह्यातील पनवेल, पेण तालुक्यातील तसेच रोहा तालुक्यातील नागोठाणे येथील विविध सामाजिक व राजकीय आंदोलकांवरील दाखल केलेले व सध्या प्रलंबित असलेले खटले काढून टाकण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी माहे डिसेंबर २०१७ मध्ये वा त्यादरम्यान मा. अतिरिक्त मुख्य सचिव, गृह विभाग, मंत्रालय मुंबई यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, सनदशीर मार्गाने बेमुदत आंदोलन, उपोषण करणा-या आंदोलनातील सामाजिक व राजकीय कार्यकर्त्यांवर पोलीसांनी मुंबई पोलीस अधिनियमाच्या तरतुदीखाली गुन्हे दाखल केले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर आंदोलनात जिवीत हानी व मालमत्तेचे नुकसान झाले नसतानाही आंदोलकांविरोध खटले प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून सामाजिक व राजकीय कार्यकर्त्यांविरोधात दाखल केलेले व सध्या प्रलंबित असलेले खटले मागे घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-११-२०१८) :** (१) होय.
(२) होय.

पनवेल तालुक्यात, अनुक्रमे खारघर पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. ७१/२०१० व तळोजा पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. १९६/२००८ गुन्हे दाखल आहेत.

रोहा तालुक्यात नागोठणे पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. ७५/२०१३ अन्वये गुन्हा दाखल आहे.

पेण तालुक्यात वडखळ पोलीस ठाणे येथे अनुक्रमे गु.र.क्र. २३/२०१४ व गु.र.क्र. ४/२०१६ अन्वये गुन्हे दाखल आहेत.

(३) तळोजा पोलीस ठाणे येथील गु.र.क्र. १९६/२००८ व वडखळ पोलीस ठाणे येथील गु.र.नं. २३/२०१४ गुन्हयात मालमत्तेचे नुकसान झालेले आहे.

(४) पोलीस आयुक्त, नवी मुंबई यांच्या अध्यक्षतेखालील राजकीय व सामाजिक आंदोलनातील खटले मागे घेणे बाबतच्या समितीच्या बैठकीत, खारघर पोलीस ठाणे येथील गु.र.क्र. ७१/२०१० हा खटला मागे घेण्याबाबत निर्णय घेण्यात येऊन आवश्यक ती पुढील कार्यवाही करणेबाबत सरकारी अभियोक्ता यांना कळविण्यात आले आहे.

गृह विभाग, शासन निर्णय क्र. पीआरओ-०५१६/ प्र.क्र.१०६/विशा-२, दि. ३०.८.२०१६ अन्वये फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ३२१ नुसार राजकीय व सामाजिक आंदोलनातील खटले मागे घेण्याबाबत मा.अध्यक्ष, मंत्रिमंडळ उपसमिती तथा मंत्री (वित्त, नियोजन व वने) यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या समितीने, वडखळ पोलीस ठाणे येथील गु.र.क्र. २३/२०१४ व ४/२०१६ हे खटले मागे घेण्याबाबत कोर्टाची अनुमती मागावी असा निर्णय घेतला आहे. त्यानुसार गु.र.क्र. २३/२०१४ हा खटला मा.न्यायालयाने दि. ३/५/२०१८ रोजी मागे घेतला आहे.

उर्वरित खटल्यांबाबत, पोलीस आयुक्त, नवी मुंबई व जिल्हादंडाधिकारी, रायगड व पोलीस अधिक्षक, रायगड यांच्याकडून माहिती मागविण्यात आली असून माहिती प्राप्त होताच त्यावर विधि व न्याय विभागाचे अभिप्राय घेऊन पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ठाणे खंडणी विरोधी पथकाने अमरावतीचे पोलीस उप अधिक्षक श्री.प्रविण पाटील यांचे खंडणी मागणाऱ्या श्री.सतीश मांगले यांच्याशी संबंध असल्याबाबत**

**(१३) १०६४९४ (०७-०४-२०१८). श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे खंडणी विरोधी पथकाने अमरावतीचे पोलीस उप अधिक्षक (डीवायएसपी) श्री.प्रविण पाटील यांचे श्री.राधेश्याम मोपलवार यांच्याकडे रुपये १० कोटीची खंडणी मागणाऱ्या श्री.सतीश मांगले यांच्याशी संबंध असल्याचे उघडकीस आल्यानंतर श्री.प्रविण पाटील यांची कसून चौकशी केल्याची बाब दिनांक १२ डिसेंबर २०१७ रोजी वा त्या सुमारास उघडकीस आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, डोंबिवली येथील पलावा सिटी येथे राहणाऱ्या श्री.सतीश मांगले यांच्या घराची दिनांक ३१ ऑक्टोबर रोजी पडताळणी केली असता, अमरावती ग्रामीण चे पोलीस उपधिक्षक श्री.प्रविण पाटील यांच्याशी श्री.सतीश मांगले सतत संपर्कात होता असे आढळून आल्यामुळे खंडणी विरोधी पथकाने श्री.प्रविण पाटील यांच्या घेतलेल्या जाबजबाबात कोणत्या बाबी उघडकीस आल्या आहेत,

(३) असल्यास, तद्नुसार दोषी असणाऱ्या व्यक्तींविरुध्द कोणती  कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-११-२०१८) :** (१) व (२)  श्री. सतीश मांगले यांच्या घराची झडती घेतली असता त्यांच्या मोबाईलचे सीडीआर प्राप्त करण्यात आले असून त्यामध्ये श्री. प्रवीण पाटील हे आरोपी मांगले यांच्या संपर्कात असल्याचे दिसून आले.  त्या अनुषंगाने गुन्ह्याचे तपासात दि. ७.१२.२०१७ रोजी प्रविण सुरेश पाटील यांच्याकडे तपास करण्यात आला असता श्री. राधेश्याम मोपलवार हे त्यांचे परिचयाचे असून श्री. मोपलवार व त्यांची पत्नी सौ. मनिषा मोपलवार यांचेत कौटुंबिक वाद चालू होते. तेव्हा श्री. मोपलवार यांनी प्रायव्हेट डिटेक्टीवबाबत प्रविण पाटील यांच्याकडे विचारणा केली होती.  त्यानुसार त्यांनी सतीष मांगले हे प्रायव्हेट डिटेक्टीव चे काम करत असल्याचे सांगून ओळख करुन दिली होती व मांगले यांचा मोबाईल नंबर श्री. मोपलवार यांना दिला होता. त्यानंतर मांगले यांनी मोपलवार यांच्या घटस्फोट प्रकरणी मध्यस्ती केली असल्याचे सांगितले.  श्री. मांगले व त्यांची पत्नी सौ. श्रध्दा मांगले व इतर साथीदारांनी श्री. मोपलवार यांच्याकडे भ्रष्टाचाराबाबत खोटी ध्वनीफित प्रसारमाध्यमांना देवून त्यांची बदनामी करुन त्यांचेकडे ७ कोटी रुपयांची मागणी करु लागले व त्यानंतर १ कोटी रुपये खंडणीची रक्कम स्विकारतांना सतीष मांगले यास पोलीसांनी अटक केले.  त्यामुळे सदर गुन्ह्यात श्री. प्रविण पाटील यांचा सहभाग असल्याचे आढळून आलेले नाही

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई शहरात आधारकार्ड काढण्यासाठी पुरेशी केंद्र नसल्याबाबत**

**(१४) १०७३६९ (१७-०४-२०१८). श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.नरेंद्र महेता (मिरा भाईंदर), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरात आधारकार्ड काढण्यासाठी पुरेशी केंद्र नसल्याने आधार केंद्रासमोर नागरिकांना दोन-दोन दिवस पुन्हा रांगा लावाव्या लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच मुंबईतील विलेपार्ले, अंधेरी, सांताक्रूझ इत्यादी भागात सद्यस्थितीत आधार कार्डची नोंदणी करणारे एकही केंद्र नसल्यामुळे ज्यांची नोंदणी बाकी आहे, त्यांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, ज्या ठिकाणी केंद्र आहे तेथे केवळ दिवसभरात वीसच नोंदणी होत असल्यामुळे पहाटे पाच वाजल्यापासून केंद्राबाहेर रांगा लागत असल्याचे समजते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, युआयडी वेबसाईटवर दिल्या गेलेल्या याद्यांमधील केंद्रही कार्यन्वित नसल्यामुळे सदर परिसरातील लोकांना, जेष्ठ नागरिकांना व अपंगाना खूप त्रास सहन करावा लागत असल्याचे कळते, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर परिसरातील लोकांना पुरेसे व कायमस्वरूपी आधार नोंदणी केंद्र उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-११-२०१८) : (**१)हे खरे नाही. मुंबई शहरात एकूण २५ व मुंबई उपनगरात २५८ आधार संच उपलब्ध आहेत. तसेच मुंबई महानगरपालिका शहर वार्ड कार्यालयांत ९ व मुंबई महानगरपालिकेच्या उपनगरातील वार्ड मध्ये १३ आधार संच उपलब्ध आहेत. त्याव्यतिरिक्त बँक व पोस्ट ऑफिसमध्ये एकुण १७८ आधार संच कार्यान्वित आहेत.

(२)हे खरे नाही. मुंबई उपनगरातील विलेपार्ले भागात १, अंधेरी भागात ३ व सांताक्रूझ भागात १ आधार नोंदणी केंद्र कार्यान्वित आहेत.

(३) हे खरे नाही. मुंबई उपनगर मधील आधार नोंदणी केंद्रामध्ये दिवसाला २० पेक्षा जास्त आधार नोंदणी होत आहे.

(४) हे खरे नाही. केंद्र चालकाकडे online विनंती अर्ज केल्यास आधार केंद्र चालक जेष्ठ नागरिक तसेच अपंग व्यक्तीच्या निवासस्थानी जाऊन आधार कार्ड काढण्याचे काम करण्यात येते.

(५) जिल्हाधिकारी कार्यालय मुंबई उपनगर मार्फत कार्यालयाच्या परिसरात जिल्हा मध्यवर्ती आधार नोंदणी केंद्र सुरु करण्यात आली असुन केंद्रामध्ये १५ ते २० आधार नोंदणी संच कार्यान्वित आहेत.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भांडुप (पश्चिम) येथील श्रेणिक प्रसूतीगृहात महिलेचा झालेला मृत्यु**

**(१५) १०७९७८ (२०-०४-२०१८). श्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भांडुप (पश्चिम) येथील श्रेणिक प्रसूतीगृहात दिनांक १५ ऑक्टोबर, २०१७ रोजी प्रसुतीसाठी दाखल झालेली गर्भवती महिला सौ. दीपा मौर्य (वय ३५) हीस अतिज्वर असतांनाही प्रसुतीगृहातील डॉक्टरांनी योग्य ते उपचार न केल्याने प्रसुतीनंतर महिलेची प्रकृती गंभीर झाल्यामुळे प्रसुतीगृहाच्या डॉक्टर श्रीमती ममता जागियासी यांनी दिनांक १७ ऑक्टोबर, २०१७ रोजी सदर महिलेस मुलुंडच्या फोर्टिस रुग्णालयात दाखल केल्यानंतर उक्त प्रसुत महिलेचा मृत्यु झाला व तिच्या दहा दिवसाच्या बाळाला डेंग्युची लागण झाली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रसुत महिलेवर श्रेणिक प्रसूतीगृहात योग्य ते औषधोपचार न केल्याने व रक्त चाचणी न झाल्याने तिचा मृत्यु व तिच्या नवजात शिशुला झालेला डेंग्यु याबाबत तिच्या नातेवाईकांना भांडुप पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवून श्रेणिक प्रसुतीगृह डॉक्टरांविरुध्द गुन्हा दाखल करण्यास नकार देण्यात आला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, श्रेणिक प्रसूतीगृहाच्या हलगर्जीपणामुळे डॉक्टरांबाबत तक्रार नोंदवून नकार देणाऱ्या भांडुप पोलिस ठाण्याच्या संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द व प्रसूतीगृहाच्या डॉक्टरांविरुध्द कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-११-२०१८) :**(१) गर्भवती महिला हिला तिचा पती दिनांक १५.१०.२०१७ रोजी श्रेणिक रुग्णालय येथे उपचाराकरीता घेवून गेले होते. त्यानंतर दिनांक १६.१०.२०१७ रोजी सदर महिला प्रसूत होवून तिला मुलगा झाला. परंतु, तिच्या प्रसुतीनंतर तिला रक्तस्त्रावाचा त्रास सुरु झाल्याने पुढील उपचाराकरीता फोर्टीस रुग्णालय भांडुप येथे व तिच्या बाळास मुलुंड येथील पंचशीर रुग्णालय येथे दाखल करण्यात आले होते. प्रसुत महिला व तिच्या बाळास डेंग्यु असल्याबाबत फोर्टीस रुग्णालय येथे निदर्शनास आले. त्यानंतर उपचारादरम्यान दिनांक २५.१०.२०१७ रोजी प्रसुत महिलेचा मृत्यू झाला.याबाबत फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १७४ अन्वये अकस्मात मृत्यू दाखल करण्यात आला आहे.

(२) व (३) हे खरे नाही.

मा. सर्वोच्च न्यायालयाचे एआयआर-२००९, SUPREME COURT २०४९ PART ११७ मध्ये, डॉक्टर /हॉस्पीटल विरुध्द तक्रार प्राप्त झाल्यास तज्ञ समितीने दिलेल्या निष्कर्षानुसारच पुढील कायदेशीर कारवाई करावी, असे निर्देशीत केले आहे.

तसेच, शासन निर्णय क्र. न्यायीक-२०१०/प्र.क्र. १६/सेवा-४ब, दिनांक २६ मार्च, २०१० अन्वये जे.जे. रुग्णालय येथे गठीत करण्यात आलेल्या तज्ञ समितीचा अहवाल प्राप्त झाल्यावर पुढील कायदेशीर कारवाई करण्याबाबत नमूद करण्यात आले आहे.

उपरोक्त तरतुदीच्या अनुषंगाने सदर महिलेवर करण्यात आलेल्या उपचाराबाबतची कागदपत्रे त्रिस्तरिय तज्ञ समिती, जे. जे. रुग्णालय, भायखळा, मुंबई यांना पाठविण्यात आली असून त्यांच्याकडील अहवाल प्राप्त करुन पुढील कायदेशीर कार्यवाही करण्यात येणार आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे शहरातील एका वृद्ध व्यक्तीची आर्थिक फसवणुक केल्याबाबत**

**(१६) १०८२७२ (११-०४-२०१८). श्री.अमर काळे (आर्वी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरातील श्री.मनोहर केळकर या ७७ वर्षीय व्यक्तीने पुण्याच्या शिवाजी नगर पोलीस ठाण्यात माधव भंडारी, सुनिल जोशी व माधव कुलकर्णी या तिघांविरुध्द आर्थिक फसवणूक केल्याप्रकरणी फौजदारी गुन्हा दाखल करण्याची लेखी मागणी केल्याची बाब दिनांक ११ डिसेंबर २०१७ रोजी वा त्या सुमारास, उघडकीस आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरण मुंबईत घडल्याने या प्रकरणी पुणे पोलीस आयुक्तांमार्फत मुंबई पोलीस आयुक्तांना हे प्रकरण कधी पाठविण्यात आले, ते मुंबई पोलीस आयुक्तांना कधी मिळाले व मुंबई पो.आयुक्तांनी याचा तपास करण्याकरीता कोणत्या पो.अधिकाऱ्याकडे व पो.स्टेशनकडे सुपुर्द केले आहे,

(३) असल्यास, सदर प्रकरणाचा तपास पूर्ण झाला आहे काय, मुंबई पोलीसांनी तक्रारदार श्री. मनोहर केळकर यांचा नव्याने जाबजबाब घेतला आहे काय, तपासाचे निष्कर्ष काय आहेत व तद्नुसार दोषी व्यक्तींविरुध्द कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-११-२०१८) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) सदर प्रकरणी तक्रार अर्ज पुणे पोलीस आयुक्त कार्यालयामार्फत दिनांक २८.११.२०१७ रोजी पाठविण्यात आला आहे. सदर तक्रार अर्ज पोलीस आयुक्त कार्यालयास दिनांक ६.१२.२०१७ रोजी प्राप्त झाला. सदर अर्ज पोलीस आयुक्त, मुंबई कार्यालयाकडून एम.आर.ए.मार्ग पोलीस ठाणे येथे चौकशीसाठी पाठविण्यात आला आहे.

(३) सदर प्रकरणामध्ये श्री. मनोहर केळकर व गैरअर्जदार श्री. सुनिल जोशी यांचा सविस्तर जबाबत नोंद करण्यात आला असून सद्यस्थितीत प्रकरणाची चौकशी सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**किनवट (जि.नांदेड) येथे नवीन पोलीस ठाणे व पोलीस निवासस्थाने बांधण्याबाबत**

**(१७) १०९१६१ (०५-०४-२०१८). श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) किनवट (जि.नांदेड) येथील १०० वर्षापूर्वीचे निजामकालीन पोलीस ठाणे व ४० वर्षापूर्वी बांधण्यात आलेली पोलीस निवासस्थाने गैरसोयीची ठरत असल्याने या इमारतींच्या नुतनीकरणाचा प्रस्ताव मागील ३ वर्षापासून शासनाकडे मंजूरीच्या प्रतिक्षेत असल्याचे दिनांक २९ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रस्तावाला शासनाने मान्यता देवून व निधीची तरतूद करुन येथे नवीन पोलीस ठाणे व पोलीस निवासस्थाने बांधण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-११-२०१८) :**

(१) व (२) उक्त प्रस्ताव महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ मर्यादित, मुंबई यांच्याकडे सादर करण्याची कार्यवाही क्षेत्रीय स्तरावर सुरु आहे.

(३) प्रश्न उदभवत नाही.

---

**गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्यांच्या जिवितास धोका असल्यास त्यांना सशुल्क पोलीस संरक्षण देण्याबाबत**

**(१८) १०९७०२ (०५-०४-२०१८). श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्यांच्या जिवितास खरोखरच धोका असेल, तर संबंधित पोलीस अधिकाऱ्यांनी सर्व बाबींचा विचार करुन त्यांना संरक्षण देण्याचा निर्णय घ्यावा असे गृह विभागाने माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान प्रसिद्ध केलेल्या मार्गदर्शक सूचीमध्ये नमूद केले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, त्यांच्या संरक्षण शुल्क आकारणीबाबत हमी असावी म्हणून संरक्षण देण्यात आलेल्या प्रत्येक संबंधितांकडून यापूढे तीन महिन्यांच्या शुल्काची रक्कम बँक हमी म्हणून घेतली जाणार असल्याने अद्यापपर्यंत किती गुन्हेगारांना संरक्षण देण्यात आले व त्यांच्याकडून किती रक्कम वसूल करण्यात येणार आहे,

(३) असल्यास, या मार्गदर्शक सूचीमध्ये आणखी कोणकोणत्या बाबी नमूद करण्यात आल्या आहेत,

(४) असल्यास, मार्गदर्शक सुचीमध्ये नमूद केलेल्या बाबीं संदर्भात शासनाची भूमिका काय आहे व तद्नुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-११-२०१८)** :(१) होय, हे खरे आहे.
(२) राज्यातील पोलीस आयुक्त व पोलीस अधीक्षक हे जीवीतास धोका असलेल्या व्यक्तींच्या धोक्याचे स्वरुप व परिमाण याचा विचार करुन त्यानुसार त्यांना संरक्षण पुरवायचे अथवा कसे याचा निर्णय घेतात व सदर शासन निर्णय दि.४/१/२०१८ मधील सुत्रानुसार शुल्क आकारतात. सदर मार्गदर्शक सूचना मा.उच्च न्यायालय,मुंबई येथे दाखल जनहित याचिका क्र.७७/२०१६ मध्ये मा.न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार विहीत करण्यात आल्या आहेत.
(३) सदर शासन निर्णय शासनाच्या maharashtra.gov.in. या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संकेतांक २०१७११२११७१७४५७०२९ असा आहे.मार्गदर्शक सुचिमध्ये अंतर्भूत असणाऱ्या बाबी थोडक्यात खालीलप्रमाणे आहेत.

एखाद्या व्यक्तीस पोलीस संरक्षण देतांना, त्या व्यक्तीचे सामाजिक स्थान/प्रतिष्ठा काय आहे याचा विचार न करता, केवळ त्याच्या जीवीतास असणाऱ्या धोक्याचे स्वरुप व परिमाण याचा विचार करण्यात यावा. पोलीस संरक्षण पुरविण्यात आलेल्या प्रकरणांचा आढावा घेण्यासाठी पोलीस आयुक्त व पोलीस अधीक्षक स्तरावर समिती गठीत करण्यात आली आहे. तसेच पोलीस महासंचालकांच्या अध्यक्षतेखाली एक राज्यस्तरीय आढावा समिती गठीत करण्यात आलेली आहे.

एखाद्या व्यक्तीच्या आयकर प्रपत्रानुसार त्याचे मासिक उत्पन्न रु.५०,०००/-(रुपये पन्नास हजार फक्त) पेक्षा कमी असेल तर त्याला सदर संरक्षण शुल्क लागू होणार नाही.
(४) मा.उच्च न्यायालयात दाखल करण्यात आलेल्या जनहित याचिकेच्या अनुषंगाने व न्यायालयाच्या सहमतीने सदर शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## भिवंडी (जि.ठाणे) येथील मदरशातील मुलांना जेवणातून झालेली विषबाधा

**(१९) १०९९१६ (१७-०४-२०१८). श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी (जि.ठाणे) येथील धामणकर नाक्यावरील मोहसीन कंपाऊंड मध्ये मुखत्यार अताउल्ला शेख यांच्या ग्यारहवी नियाजसाठी असलेल्या दावतमधील जेवणातून दारूनउलूम दिवशांह या मदरशामधील ३५ मुलांना विषबाधा झाली असल्याचे दिनांक १९ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त विषबाधा झालेल्या मुलांना भिवंडी येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले त्यातील इरफान हक (वय-१३), आफनान हक (वय-१३), समीर मुस्लीम (वय-११), रमझान शकील (वय-१३) दाशिण या मुलांची प्रकृती गंभीर झाल्याने त्यांना मुंबई येथील नायर रुग्णालयात दाखल करण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-११-२०१८)** :(१) व (२) होय, हे खरे आहे
(३) प्रस्तुत प्रकरणी दावत दरम्यान बनविण्यात आलेले पदार्थाचे नमुने रासायनिक विश्लेषन कामी न्यायसहायक प्रयोग शाळा, कलीना, सांताक्रुझ, मुंबई येथे पाठविण्यात आले आहेत. सदर रासायनिक विश्लेषण अहवाल अद्याप अप्राप्त असल्याने सदरबाबतचा गुन्हा नोंद करण्यात आलेला नसुन सदरबाबत अधिक चौकशी करून तसेच प्राप्त अहवालाचे अनुसार पुढील कारवाई करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे जिल्ह्यामध्ये कौशल्य विकास केंद्रातील प्रमोद महाजन प्रशिक्षण योजना राबविण्याबाबत**

**(२०) ११५६०६ (१७-०४-२०१८). श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात प्रत्येक जिल्ह्यात कौशल्य विकास केंद्र असून शासनाची प्रमोद महाजन प्रशिक्षण योजना या केंद्रांमधून राबविण्यात येते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्रमोद महाजन प्रशिक्षण योजनेंतर्गत प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यासाठी मागील ३ वर्षात एकूण किती निधी शासनाने उपलब्ध करून दिला आहे,
(३) असल्यास, पुणे जिल्ह्यामध्ये प्रमोद महाजन प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत मागील ३ वर्षात एकूण किती निधी कोणत्या संस्थांना दिला आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (०६-११-२०१८)** :(१) होय.
(२) सन २०१५-१६ मध्ये मंजूर रू.१३४३.७४ लाख पैकी रू.१३४३.७४ लाख, सन २०१६-१७ मध्ये मंजूर रू.११९०० लाख पैकी रू.९५५७.६९ लाख व सन २०१७-१८ मध्ये मंजूर रू.९९०२.८६ लाख पैकी रू.७९२२.२८ लाख निधी दिला आहे.
(३) पुणे जिल्ह्यामध्ये सन २०१५ ते २०१७ या कालावधीत २७६ संस्थांना एकूण रू.१,२९,२३,४८० व सन २०१७-१८ या कालावधीत ३२२ संस्थांना एकूण रू.४,७३,०२,१३४.८ इतका निधी दिला आहे. (माहितीस्तव सोबत यादी जोडली आहे.) (सदरहू यादी सचिव कार्यालयामध्ये उपलब्ध आहे.)
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विरार (ता.वसई, जि.पालघर ) येथे पोलीसांच्या जाचाला कंटाळून**
**दोन भावांनी आत्महत्या केल्याबाबत**

**(२१) ११६५७० (१२-१०-२०१८). श्री.नसीम खान (चांदिवली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विरार (ता.वसई, जि.पालघर ) येथे राहणाऱ्या तरुणाला पोलीस त्रास देत असल्याची तक्रार वरिष्ठांकडे करुनही त्याची दखल न घेतल्यामुळे एका तरुणाने माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान वसई पोलीस अधिक्षकांच्या कार्यालयात अंगावर रॉकेल ओतून घेऊन स्वत:ला पेटवून आत्महत्या केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी संबंधित पोलीसांवर कारवाई करण्याबाबत मयत तरुणाच्या भावाने पोलीसांकडे वारंवार तक्रार करूनही कोणतीच कारवाई न झाल्याने निराश झालेल्या मृताच्या भावानेही दिनांक २३ जानेवारी, २०१८ रोजी वा त्या सुमारास आत्महत्या केली , हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार याप्रकरणी जबाबदार असणाऱ्या संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-११-२०१८) :**

(१) होय, हे खरें आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) विरार (ता.वसई, जि.पालघर) येथे रहाणाऱ्या श्री.विकास झा या तरुणाविरुध्द ८ दखलपात्र व १० दखलपात्र गुन्हे दाखल आहेत तसेच त्यांचेवर हद्दपार प्रस्ताव देखील आहे. सदर तरुणाने खोटे गुन्हे दाखल करीत असल्याचे कारणाने वसई पोलीस अधिक्षकाच्या कार्यालयासमोर स्वत:स पेटवून घेऊन आत्महत्येचा प्रयत्न केला. पुढील उपचाराकरिता त्यांना कस्तुरबा हॉस्पिटल, मुंबई येथे दाखल केले असता उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला. सदर प्रकरणी माणिकपूर पोलीस ठाणे, जि.पालघर येथे गु.नों.क्र. ३१०/२०१७ भा.दं.वि.स. कलम ३०९, ३०७ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरहू मयताच्या आत्महत्येबाबत त्यांच्या भावाने पाठपुरावा केला असता चौकशीच्या अनुषंगाने माणिकपूर पोलीस ठाणे गु.र.नं. १८/२०१८ भादंवि. कलम ३०६ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला. त्यानंतर अर्नाळा पोलीस ठाणे हद्दीत मयताच्या भावाने देखील आत्महत्या केली. त्या अनुषंगाने मयताच्या वडीलांनी दिलेल्या तक्रारीवरुन ४ आरोपींविरुध्द अर्नाळा सागरी पो.ठाणे येथे गु.र.नं.१३/२०१८ भादंविस कलम ३०६, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला. सदर दोन्ही गुन्ह्यांचा तपास नि:पक्षपाती व पारदर्शकपणे होणेकामी राज्य गुन्हे अन्वेषण विभाग (सीआयडी), कोकण भवन, नवी मुंबई यांचेकडे सोपविण्यात आला आहे. तपासा दरम्यान तत्कालिन पोलीस निरीक्षक, विरार पोलीस ठाणे यांना दोन्ही गुन्ह्यामध्ये अटक करण्यात आली असून मा.न्यायालयाने त्यांना जामीन मंजूर केला आहे. सध्या सदर दोन्ही

गुन्ह्यांचा तपास राज्य गुन्हे अन्वेषण विभागामार्फत सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ना.म. जोशी मार्ग, वरळी(मुंबई) येथील पोलीस बांधवांच्या बी.डी.डी. चाळीतील वास्तव्याच्या कालावधीची अट शिथिल करण्याबाबत**

**(२२) ११७१४६ (३०-०७-२०१८). श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ना.म. जोशी मार्ग, वरळी (मुंबई) येथील बी. डी. डी. चाळ पुनर्विकास प्रक्रियेत सद्यस्थितीत त्या ठिकाणी वास्तव्य करणाऱ्या पोलीसांची घरे गृहनिर्माण विभाग गृह विभागाकडे सुपूर्द करणार असून सदरहु सदनिका संबंधित पोलीसांना वितरीत करण्याबाबत गृह विभाग निर्णय घेणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या चाळींच्या पुनर्विकास प्रक्रियेत बांधून मिळणारी घरे या ठिकाणी ३० वर्षापेक्षा अधिक काळ निवास करणाऱ्या पोलीसांना देण्याचे प्रस्तावित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहु वास्तव्याच्या कालावधीची अट शिथिल करून हा कालावधी १५ ते २० वर्षे करण्यात यावा अशी आग्रही मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी आणि पोलीस बांधवांनी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू मागणीच्या अनुषंगाने पोलीस बांधवांच्या बी.डी.डी. चाळीतील वास्तव्याच्या कालावधीची अट शिथिल करण्याबाबत शासनाकडून अद्यापपर्यंत कोणती निणर्यात्मक कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-११-२०१८) :** (१), (२), (३) व (४) बी.डी.डी.चाळीच्या पुनर्विकासासाठी पात्रतेच्या संदर्भात व इतर विषयाबाबत मा. मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २९.०१.२०१८ रोजी बैठक संपन्न झाली. सदर बैठकीत “बी.डी.डी. चाळीच्या जमिनीवर गृह विभागाच्या ताब्यात असलेल्या व पोलीस निवासस्थाने म्हणून वितरीत करण्यात आलेल्या सुमारे २९०० गाळ्यांबाबत” या मुद्याबाबत “बी.डी.डी.चाळ पुनर्विकास प्रकल्पात म्हाडाने आवश्यक संक्रमण गाळे गृह विभागास हस्तांतरित करावे व गृह विभागाने बी.डी.डी.चाळीतील गाळे रिक्त करुन म्हाडाच्या ताब्यात पुनर्विकासासाठी द्यावेत. पुनर्विकास पुर्ण झाल्यानंतर म्हाडाने पुनर्वसित गाळे (पोलीसांच्या सेवासदनिका इतके) गृह विभागास हस्तांतरित करावे व गृह विभागातर्फे पुनर्वसन गाळ्यांचे वितरण करण्यात यावे. पुर्नवसन गाळे वितरीत करणे प्रकरणी गृह विभागाने नियमावली/पात्रतेचे निकष निश्चित करावेत” असा निर्णय घेण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**येवला (जि.नाशिक) तालुक्यातील शेतकऱ्यांवरील राजकीय व सामाजिक आंदोलनातील गंभीर गुन्हे मागे घेण्याबाबत**

**(२३) ११७७५८ (२६-०७-२०१८). श्री.छगन भुजबळ (येवला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) येवला (जि.नाशिक) तालुक्यातील शेतकऱ्यांवर कलम ३०७, ३९४ व ३९५ अन्वये दाखल केलेले गुन्हे मागे घेण्याबाबत पोलीस अधीक्षक नाशिक यांच्याकडून माहे नोव्हेंबर २०१७ मध्ये वा त्या दरम्यान शासनास प्रस्ताव प्राप्त झालेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रस्तावानुसार फौजदारी प्रक्रिया संहीता १९७३ चे कलम ३२१ नुसार सदर अन्यायग्रस्त शेतकऱ्यांवरील राजकीय व सामाजिक आंदोलनातील खटले मागे घेण्याबाबत शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-११-२०१८) :** (१) होय.

(२) व (३) गृह विभाग, शासन निर्णय क्र. पीआरओ-०५१६/ प्र.क्र.१०६/विशा-२, दि. ३०.८.२०१६ अन्वये फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ३२१ नुसार राजकीय व सामाजिक आंदोलनातील खटले मागे घेण्याबाबत निर्णय घेण्यासाठी मा.अध्यक्ष, मंत्रिमंडळ उपसमिती तथा मंत्री (वित्त, नियोजन व वने) यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली आहे. सदर समितीपुढे याबाबतचा प्रस्ताव निर्णयार्थ ठेवला असता, सदर प्रस्ताव सद्या प्रलंबित ठेवावा व तो समितीच्या पुढील बैठकीत ठेवावा, असा निर्णय समितीने घेतला आहे.

---

**ठाणे खाडीतुन ठाणे-वसई-कल्याण-नवी मुंबई दरम्यान जलवाहतुक सुरु करण्याचे प्रकल्प**

**(२४) ११८१८८ (२६-०७-२०१८). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.विलास तरे (बोईसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे खाडीतुन ठाणे-वसई-कल्याण-नवी मुंबई दरम्यान जलवाहतुक सुरु करण्यासंदर्भातील प्रकल्पावर निर्णय घेण्यासाठी दिनांक २४ एप्रिल, २०१८ रोजी वा त्या सुमारास बैठक घेतलेली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रश्नी घेतलेल्या बैठकीतील निर्णयाचे थोडक्यात स्वरुप काय आहे, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) तसेच, सदर प्रकरणी घोडबंदर रोडवरील वाहतूक कोंडी दिवसेंदिवस मोठ्या प्रमाणात वाढत असल्याने ती कमी करण्यासंदर्भात अद्यापपर्यंत जल वाहतूक मार्ग त्वरेने मार्गी लावण्यासाठी कोणता पाठपुरावा केला वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-११-२०१८) :** (१) होय.
(२) व (३) दिनांक २४ एप्रिल, २०१८ रोजी मा.केंद्रीय मंत्री व मा.मुख्यमंत्री यांच्यासमवेत झालेल्या बैठकीत सदर प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी संयुक्त करार करण्याबाबत निर्देश देण्यात आले होते. त्यानुसार संयुक्त करार (MOU) मसुदा अंतिम करण्याची कार्यवाही भारतीय अंतर्देशीय जलमार्ग प्राधिकरण, दिल्ली आणि रस्ते वाहतूक आणि महामार्ग, नौकानयन व जलसंपदा केंद्रीय मंत्रालयामार्फत सुरु आहे. केंद्र शासनाच्या भारतीय अंतर्देशीय जलमार्ग प्राधिकरण, दिल्ली (IWAI) यांच्याकडे वसई-ठाणे-कल्याण या जलमार्गाचा सविस्तर प्रकल्प अहवाल मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे आणि प्रकल्प अंमलबजावणीसाठी निधीची मागणी करण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## भिमा-कोरेगांव येथे झालेल्या दंगलीप्रकरणी नेमण्यात आलेल्या चौकशी समितीच्या कामाबाबत

**(२५) ११९२९३ (२५-०७-२०१८). डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिमा-कोरेगांव येथे दिनांक १ जानेवारी, २०१८ रोजी झालेला हिंसाचार व यामुळे राज्यभर उमटलेल्या दंगली आणि जाळपोळ याप्रकरणाची चौकशी करण्यासाठी राज्य शासनाने चौकशी समिती नेमली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर चौकशी ही कोणत्या सक्षम अधिकाऱ्यांमार्फत करण्यात येत आहे,
(३) असल्यास, याच दंगलीच्या अनुषंगाने माओवाद्यांशी संबंध असल्याच्या संशयाने पुणे जिल्ह्यासह अनेक ठिकाणी छापे घालण्यात येऊन पुणे जिल्ह्यातील येरवडा, वाकड येथे

करण्यात आलेल्या तपासणीत आक्षेपार्ह कागदपत्रे व प्रचार साहित्यही जप्त करण्यात आले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याप्रकरणाची चौकशी पूर्ण होण्यास किती कालावधी लागणार आहे व त्यानुषंगाने चौकशीच्या कार्यवाहीची सद्यःस्थिती काय आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-११-२०१८) :**(१) व २ ) हे खरे आहे.

कोरेगाव-भिमा ता.शिरुर जि.पुणे येथे दि.०१.०१.२०१८ रोजी घडलेल्या घटनेच्या अनुषंगाने न्यायालयीन चौकशी करण्यासाठी मा.श्री.जयनारायण पटेल, सेवानिवृत्त, मुख्य न्यायाधिश, उच्च न्यायालय यांच्या अध्यक्षतेखाली आणि मा.श्री.सुमीत मलीक , (सेवानिवृत्त मुख्य सचिव )सदस्य अशा आयोगाची नियुक्ती दि.९.२.२०१८ च्या अधिसुचनेन्वये केली आहे.
(३) हे खरे आहे.
(४)यासंबंधात विश्रामबाग पोलीस स्टेशन येथे गु.र.नं.४/२०१८ भा.द.वि.क.१५३ (अ),५०५((१)(ब),११७,१९६७,सुधारित अधिनियम २०१२ कलम १३,१६,१७,१८,,१८(ब)२०,३८,३९,४० प्रमाणे गुन्हा दाखल आहे. सदर प्रकरणी माहे डिसेंबर २०१८ अखेर पर्यत गुन्ह्याचा तपास चालू राहण्याची शक्यता आहे
(५) विलंब झालेला नाही.

---

**ठाणे जिल्हा रुग्णालयात झालेल्या विनयभंगाच्या घटनांबाबत**

**(२६) ११९३३६ (२५-०७-२०१८). श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे जिल्हा रुग्णालयात दिनांक १० मे, २०१८ रोजी वा त्या सुमारास एका ६ वर्षीय मुलीचा आणि दिनांक १७ मे, २०१८ रोजी वा त्या सुमारास एक महिलेचा विनयभंग झाल्याच्या घटना घडल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी पोलीसात गुन्हे दाखल झालेले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळुन आले व तद्नुसार संबंधितांविरुद्ध कारवाई करण्याबाबत व सदर रुग्णालयात अशा प्रकारच्या घटना घडू नये म्हणून उपाययोजना करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-११-२०१८) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

फिर्यादीने दिलेल्या तक्रारीनुसार ठाणेनगर पोलीस स्टेशन येथे दोन्ही गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

(३) घटना क्र. १ :- फिर्यादीने दिलेल्या तक्रारीनुसार ठाणेनगर पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. ७९/२०१८ भा.दं.वि. कलम ३७६ (२), (ई), (आय), बालकांचे लैंगिक अपराधापासून संरक्षण अधिनियम २०१२ चे कलम ३ (ब) (क), ४, ५ (ई) (एम), ६, ७, ८, ९ प्रमाणे आरोपीविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला असून सदर गुन्ह्यातील आरोपीस अटक करण्यात आली. मा. न्यायालयात आरोपीविरूध्द दोषारोपपत्र दाखल करण्यात आले असून सदर गुन्हा न्यायप्रविष्ठ आहे.

घटना क्र. २ :- फिर्यादीने दिलेल्या तक्रारीनुसार ठाणेनगर पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. ८२/२०१८ भा.दं.वि. कलम ३५४ प्रमाणे अनोळखी इसमाविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्याबाबत एकूण ७ साक्षीदार तपासलेले आहेत. आरोपी मिळून न आल्याने सदर गुन्हा कायमस्वरूपी तपासावर ठेवुन सदर गुन्ह्याची " अ " वर्ग समरी मंजूर होणेकरीता मा. न्यायालयात अहवाल सादर केला आहे.

ठाणे जिल्हा रूग्णालयात पुन्हा अशा घटना घडु नयेत म्हणून ठाणेनगर पो.स्टे.कडून पत्रान्वये रूग्णालयात सी.सी.टी.व्ही. कॅमेरे लावणे व सुरक्षारक्षक नेमणेबाबत कळविण्यात आले आहे. तसेच ठाणे जिल्हा रूग्णालय परिसरात शस्त्रधारी पोलीस तैनात केलेले आहेत. ठाणे जिल्हा रूग्णालय आस्थापनेकडून ७ पुरूष व ७ स्त्री असे महाराष्ट्र सुरक्षा मंडळाचे सुरक्षारक्षक नेमले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**यवतमाळ जिल्ह्यातील आदिवासी विद्यार्थ्यांच्या झालेल्या खून,मृत्यु व अपहरणाच्या घटनांची केंद्रीय अन्वेषण विभागामार्फत चौकशी करण्याबाबत**

**(२७) ११९५२४ (३०-०७-२०१८). श्री.राजु तोडसाम (अर्णी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ढाकणे (ता.पुसद, जि.यवतमाळ) येथील आदिवासी विद्यार्थ्यांच्या आश्रमशाळेतील खून प्रकरण, बेलगव्हाण येथील आदिवासी युवकांचे अपहरणाची घटना आणि घाटंजी तालुक्यातील आदिवासी विद्यार्थ्यांचा मृत्यू या तिन्ही प्रकरणाचा तपास केंद्रीय अन्वेषण विभागामार्फत (सीआयडी) करण्याची मागणी यवतमाळ जिल्ह्यातील विविध संस्था, सामाजिक कार्यकर्ते यांनी मुख्यमंत्र्यांकडे केल्याची बाब माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुसार याप्रकरणांची मुख्यमंत्र्यांनी सीआयडीमार्फत चौकशी करण्याचे आश्वासन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या तिन्ही प्रकरणाची सीआयडी चौकशी पूर्ण झाले आहे काय,चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व तदनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-११-२०१८) : (**१), (२) व (३) हे खरे नाही,

तथापि ढाणकी तालुका उमरखेड येथे आदिवासी विद्यार्थ्याचा खून प्रकरणी पो.स्टे. बिटरगांव येथे नोंद गु.र.क्र.१८४/१७ कलम ३०२, ३६३, ३६४ अ, २०१ भादंवि गुन्ह्याचा तपास स्थानिक पोलीसांकडून करण्यात आला आहे. तपासाअंती आरोपी विधी संघर्षग्रस्त बालकाविरुध्द मा.बाल न्यायालयात आरोपपत्र दाखल करण्यात आले आहे. तसेच घांटजी येथील आदिवासी विद्यार्थ्याच्या मृत्यू प्रकरणी पो.स्टे. घाटंजी येथे नोंद अकस्मात मृत्यू क्रमांक ६०/१७ कलम १७४ सीआरपीसी प्रकरणाचा तपास सुध्दा स्थानिक पोलीसांकडून करण्यात आला असून तपासाअंती अकस्मात मृत्यु समरी मंजूरी करीता सक्षम अधिकारी यांचेकडे पाठविण्यात आली आहे. पुसद तालुक्यातील बेलगव्हाण येथे आदिवासी युवकाचे अपहरणाचे घटना संदर्भात पोलीस स्टेशन पुसद ग्रामीण येथील अभिलेखावर कोणतेही प्रकरण नोंद नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईतील चेंबूरच्या माहूल परिसरात बांधण्यात आलेल्या घरांची परस्पर विक्री करणा-यांविरूद्ध कारवाई करण्याबाबत

**(२८) ११९८१७ (३०-०७-२०१८). श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.नारायण कुचे (बदनापूर), श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरातील नाले, रस्ते, रेल्वे, जलवाहिन्यांवरील अतिक्रमण आणि इतर प्रकल्पांमध्ये बाधित होणाऱ्या झोपडपट्टीधारकांसाठी चेंबूरच्या माहूल परिसरात बांधण्यात आलेल्या घरांची परस्पर विक्री करून सामान्य व्यक्तींची फसवणूक करणाऱ्यांविरुद्ध सुमारे वर्षभरानंतर गुन्हा दाखल झाल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास गुन्हा दाखल झाला असतानाही पोलीसांनी याप्रकरणी अद्याप एकालाही अटक केलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी दोषी असणाऱ्या संबंधित गुन्हेगारांना अटक करून कडक कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-११-२०१८) :**(१), (२) व (३) सदर प्रकरणी प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने ३ आरोपीविरुध्द आर.सी.एफ. पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. १५४/१८, भा.दं.वि. कलम ४२०, ४६५, ४६६, ४६७, ४६८, ४७१, ४७४, ३४ अन्वये नोंद करण्यात आला असून त्यांना अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हा सद्यस्थितीत तपासाधिन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नामदेव शिक्षण सहायक सहकारी मंडळ, सुभाषनगर वांद्रे (पू), मुंबई या संस्थेच्या आरक्षित भूखंडाची विक्री केल्याबाबत**

**(२९) १२०२५६ (२६-०७-२०१८). श्री.सुभाष साबणे (देगलूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील नामदेव शिक्षण सहायक सहकारी मंडळ, सुभाषनगर वांद्रे (पू), या संस्थेच्या वसतीगृहासाठी असलेल्या मौ.वांद्रे, ता.अंधेरी येथे स.क्र.३५१ मधील १००० चौ.मी इतका शासकीय भुखंड सदरहू संस्थेच्या विश्वस्तांनी विकासकाला परस्पर विक्री केल्याची तक्रार उपाध्यक्ष, नामदेव शिक्षण सहकारी मंडळ, सुभाषनगर, वांद्रे, मुंबई यांनी माहे जुन, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान मा.धर्मादाय आयुक्त, वरळी मुंबई यांच्याकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व तद्नुसार दोषींवर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-११-२०१८) :**(१) अंशत: खरे आहे.

मुंबईतील नामदेव शिक्षण सहायक सहकारी मंडळ, सुभाषनगर,वांद्रे (पू), या संस्थेचे उपाध्यक्ष, श्री.मधुकर कोपटे यांनी नामदेव शिक्षण सहकारी मंडळ, सुभाषनगर वांद्रे (पू), मुंबई येथील पुनर्निमाण योजनेच्या अनियमिततेबाबत तक्रार दाखल केली असून सदर तक्रारीमध्ये विक्री केल्याबाबतचा जरी उल्लेख नसला तरी तक्रारीचे स्वरुप प्रश्नांकीत नमूद भूखंडावरील विकासकांकडून करण्यात येणाऱ्या विकास काम व इतर अन्य बाबींबाबत आहे.

(२) नामदेव शिक्षण सहकारी मंडळ, सुभाषनगर वांद्रे (पू), मुंबई संस्थेचे उपाध्यक्ष, श्री.मधुकर कोपटे यांच्या दि.१६.०६.२०१७ च्या तक्रारीच्या अनुषंगाने सहायक धर्मादाय आयुक्त, बृहन्मुंबई यांच्या कार्यालयामार्फत चौकशी करण्यात आली असून सदर चौकशी अहवालाच्या अनुषंगाने दि.२७.०९.२०१८ च्या पत्रान्वये सदर संस्थेच्या विश्वस्तांना त्रुटींची पूर्तता करुन अहवाल सादर करण्याबाबत कळविण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नांदगांव (ता.नांदगांव,जि.नाशिक) येथील शासकिय औद्योगिक प्रशिक्षण संस्था येथे विद्यार्थ्यांसाठी विविध नविन ट्रेड सुरु करण्याबाबत**

**(३०) १२०६७१ (२३-०७-२०१८). श्री.पंकज भुजबळ (नांदगाव) :** सन्माननीय **कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदगांव (ता.नांदगांव,जि.नाशिक) येथील शासकिय औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आय.टी.आय) येथे विद्यार्थ्यांसाठी मोटार मॅकॅनिक, इलेक्ट्रिशियन, वेल्डर व फिटर आदी नविन ट्रेड सुरु करण्यासाठीचे प्रस्ताव औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमार्फत माहे जानेवारी २०१८ मध्ये वा त्या दरम्यान शासनाकडे मान्यतेसाठी सादर करण्यात आलेले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मोटार मॅकॅनिक, इलेक्ट्रिशियन, वेल्डर व फिटर आदी नविन ट्रेड सुरु करण्याच्या प्रस्तावांना शासनाने मंजुरी देणेबाबत कोणता निर्णय घेतला आहे व तद्नुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (०५-११-२०१८) :**(१) हे खरे नाही,

तथापि, विद्यमान शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थामधील उपलब्ध पायाभूत व प्रशिक्षण सुविधांचा १०० टक्के विनियोग करुन औद्योगिक प्रशिक्षण संस्थांचा क्षमता विस्तार आराखडा संचालनालयाने शासनास सादर केला आहे. सदर विस्तार आराखड्यामध्ये औद्योगिक प्रशिक्षण संस्था, नांदगांव, जि. नाशिक या संस्थेमध्ये सध्या मंजूर असलेल्या परंतु अद्यापि सुरू न झालेल्या मेकॅनिक मोटार व्हेईकल हा व्यवसाय अभ्यासक्रम पुढे सुरू करण्यासाठी प्रस्तावित करण्यात आलेला आहे.

(२) व (३) सदर औद्योगिक प्रशिक्षण संस्थांचा क्षमता विस्तार आराखड्याबाबतचा प्रस्ताव मा. मंत्रीमंडळाच्या मान्यतेकरिता सादर करण्याची कार्यवाही सुरु आहे.

---

**हातकणंगले ( जि.कोल्हापूर ) तालुक्यातील आळते गावात अदयापही तंटामुक्त समिती स्थापन करण्यात आली नसल्याबाबत**

**(३१) १२११८५ (२४-०७-२०१८). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हातकणंगले ( जि.कोल्हापूर ) तालुक्यातील आळते गाव अदयापही तंटामुक्त समितीपासून वंचित असल्याचे नुकतेच माहे एप्रिल,२०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गत १० वर्षापासून तंटामुक्त समिती नसल्याने वर्षाला पाच लाख रुपयांचे पुरस्कार परत जात आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आळते गावात अनेक वादविवाद होत असतात यासाठी नागरिकांना हातकणंगले पोलिस ठाण्यामध्ये तक्रारीसाठी जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व तदनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-११-२०१८)** :(१) होय.
(२) नाही,
शासन निर्णय, गृह विभाग क्र.तंमुगा १००८/सीआर-४३/२००८/पोल-१५, दि.१४/०८/२००८ मधील विहित तरतुदीनुसार आळते गावामध्ये तंटामुक्त समिती स्थापन नसल्याने सदर गाव पुरस्कारास पात्र नाही.
(३) आळते गाव हातकणंगले पोलीस स्टेशनच्या हद्दीत येत असल्याने तक्रारीसाठी सदर पोलीस ठाण्यामध्ये नागरिकांना जावे लागते.
(४) व (५), गावच्या ग्रामसभेत तंटामुक्त समिती स्थापन करणेबाबत उप विभागीय पोलीस अधिकारी, जयसिंगपूर जि.कोल्हापूर विभाग व पोलीस निरीक्षक, हातकणंगले पोलीस ठाणे, जि.कोल्हापूर यांनी वारंवार प्रयत्न करुनही आळते गावात तंटामुक्त समिती स्थापन करण्याबाबत एकमत व त्या गावच्या ग्रामसभेत गणपूर्ती न झाल्याने अद्यापि सदर गावात तंटामुक्त समिती स्थापन झालेली नाही.

---

**कोल्हापूर जिल्हयातील पोलीस ठाण्यात चारित्र्य पडताळणी, पासपोर्टची कागदपत्रे पडताळणीसाठी येणा-या सामान्य नागरिकांकडून नियमबाह्यपणे पैसे घेण्यात येत असल्याबाबत**

**(३२) १२१२०३ (३०-०७-२०१८). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर जिल्हयातील पोलीस ठाण्यात चारित्र्य पडताळणी, पासपोर्टची कागदपत्रे पडताळणीसाठी येणा-या सामान्य नागरिकांकडून पैसे उकळण्याची वृत्ती वाढली असल्याचे माहे मार्च, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-११-२०१८) :**(१) हे खरे नाही. कोल्हापूर जिल्ह्यातील कोणत्याही पोलीस ठाणेकडे किंवा पोलीस अधिक्षक कार्यालयाकडे याबाबत तक्रार प्राप्त झालेली नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### ब्रेन स्ट्रोकच्या आजारावर उपचार घेत असलेल्या बीपीएल रुग्णाकडून साडेचार लाख रुपये जसलोक रुग्णालयाने घेतले असल्याबाबत

**(३३) १२१३०९ (०६-०८-२०१८). श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ब्रेन स्ट्रोकच्या आजारावर उपचार घेत असलेल्या बीपीएल रुग्णाचे साडेचार लाख रुपये जसलोक रुग्णालयाकडून घेण्यात आल्याची बाब माहे एप्रिल २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली , हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय ,
(३) असल्यास, त्यानूसार पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-११-२०१८) :**(१) नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### दानोळी (जि.कोल्हापूर ) येथे शासकीय कामात अडथळा केल्याप्रकरणी दाखल करण्यात आलेले गुन्हे

**(३४) १२१३१९ (३०-०७-२०१८). श्री.उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्ह्यातील वारणा पाणी योजनेचा प्रारंभ करण्यासाठी जात असतांना शासकीय कामात अडथळा व जिल्हाधिकारी यांच्या आदेशाचा भंग केल्याप्रकरणी दानोळी येथील ९० जणांसह १४०० अनोळखी व्यक्तीवर माहे मे, २०१८. वा त्या दरम्यान गुन्हा दाखल केला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू कार्यक्रम हा शासकीय कार्यक्रम होता काय,
(३) असल्यास, या प्रकरणाची न्यायालयीन चौकशी करण्यात येणार आहे काय,
(४) असल्यास, सदरहू गुन्हे खोटे असल्याच्या निषेधार्थ स्थानिकांद्वारे दिनांक ४ मे, २०१८ रोजी वा त्या सुमारास शिरोळ तालुका बंद करण्यात आला होता, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या प्रकरणी शासनाची भूमिका काय आहे व तद्नुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-११-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय.
(३), (४) व (५) केंद्र शासनाच्या अमृत अभियाना अंतर्गत अमृत इचलकरंजी पाणी पुरवठा योजनेचे काम सुरु करण्यात आले होते. या योजनेस दानोळी गावांच्या जनतेचा विरोध होता म्हणून या योजनेच्या प्रारंभ करण्यासाठी जात असताना दानोळी गावच्या जनतेकडून रस्त्यावर रबरी टायर्स पेटवून ठिकठिकाणी दगड टाकून रस्ते अडविण्यात आलेले होते. जमावाने गावांतील काही दुकाने व इतर व्यवहार बंद केलेला होता. सदर ठिकाणी सुमारे १५०० लोक रस्ता अडवून उभे होते. सदर बाबत त्यांना रस्ता न अडविणे व कायद्याचे उल्लघन न करणेबाबत पोलीसांनी समजावून सांगितले. तरी देखील जमाव आक्रमक होऊन शासकीय अधिकारी व कर्मचारी यांना धक्के मारुन व सदर योजनेचे काम सुरु करण्यास विरोध करीत होते. त्यामुळे शासकीय कामात अडथळा आणल्यामुळे व फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन जयसिंगपूर पोलीस ठाणे गु.र.नं. ९५/२०१८ भा.दं.वि.स. कलम १४३,१४७,१४९,३५३, ३४१,१८६ सार्वजनिक मालमत्ता नुकसान अधिनियम कलम ७ सह महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम १३५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यात आरोपींना अटक करुन त्यांना जामीन मंजूर केला आहे. सदर गुन्ह्याबाबत तपास सुरु आहे.

सदर गुन्हा दाखल झाल्याच्या निषेधार्थ दि.०४.०५.२०१८ रोजी वारणा बचाव कृती समितीतर्फे शिरोळ तालुका बंद पुकारण्यात आला होता.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## हिंगोलीच्या महिला पोलीस उप अधीक्षक यांना रिक्षा चालकाने अपमानास्पद वागणूक दिल्याबाबत

**(३५) १२१४१३ (३०-०७-२०१८). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोलीच्या महिला पोलीस उप अधीक्षक ह्या दिनांक २४ मार्च,२०१८ रोजी भोपाळहून मुंबईत आल्या असता, त्यांनी अंधेरी रेल्वे स्टेशन वरील रिक्षावाल्याला विनंती केली असता त्याने त्यांच्याशी मुजोरी केली व भाडे नाकारले त्याबाबत अंधेरी पोलीस स्टेशन मध्ये तक्रार नोंदविण्यास गेल्या असता तिथेही त्यांना अपमानास्पद वागणूक देण्यात आल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी संबंधित दोषी पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याबाबत मा.विरोधी पक्षनेता विधानसभा यांनी मा.मुख्यमंत्री यांना माहे एप्रिल,२०१८ मध्ये वा त्या दरम्यान पत्र पाठवून विनंती केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने अधिक चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार याप्रकरणी संबंधित दोषी पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-११-२०१८) :**(१) हे, खरे नाही.
(२)मा. विरोधी पक्षनेता, विधानसभा यांनी निवेदन दिल्याचे आढळून आले नाही.
(३),व (४) होय.

सदर प्रकरणी सहायक पोलीस आयुक्त दादाभाई नौरोजी नगर विभाग यांनी केलेल्या चौकशीत श्रीमती पाटील, यांना पोलीसांनी अपमानास्पद वागणूक दिल्याचे निष्पन्न झालेले नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे शहर मोलकरीण संघटनेने विविध मांगण्याकरीता मा. पालकमंत्री, जि.पुणे यांना दिलेले निवेदन

**(३६) १२१७०९ (२६-०७-२०१८). श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केंद्र सरकारने मंजूर केल्याप्रमाणे व घरेलू कामगारांच्या राष्ट्रीय मसुद्याप्रमाणे राज्य सरकारने घरेलू कामगारांना हक्क, अधिकार द्यावा त्यांना किमान सामाजिक संरक्षण देण्यात यावे या मागण्यासाठी पुणे शहर मोलकरीण संघटनेने कामगारांच्या स्वाक्ष-यांचे निवेदन संबंधित मा. पालकमंत्री, जि.पुणे यांना देण्यात आल्याचे दिनांक ७ एप्रिल, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त मागण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (०२-११-२०१८) :**
(१) हे खरे आहे.
(२) दि. १०/१०/२०१७ रोजी केंद्र सरकारने घरेलु कामगारांच्या बाबत प्रसिद्ध केलेल्या राष्ट्रीय धोरणांच्या मसुद्यावर केंद्र शासनाचा अंतिम निर्णय झालेला नाही.

दि.२७/३/२०१५ रोजीच्या अधिसुचनेद्वारे विकास आयुक्त ( अ.का) कामगार यांची एक सदस्य मंडळ या नात्याने नियुक्ती झालेली आहे..

घरेलु कामगारांसाठी खालील लाभ देण्यात येत आहेत ;-

१)मृत घरेलु कामगारांच्या कायदेशीर वारसांस अंत्यविधी सहाय्य रु २०००

२)घरेलु कामगारांस २ अपत्य पर्यंत प्रत्येक प्रसुती करीता रु ५००० इतकी मदत देण्यात येत आहे.

३)दि. ३१/७/२०१४ पर्यंत ज्या नोंदीत घरेलु कामगारांनी वयाची ५५ वर्ष पुर्ण झालेली अशा नोंदीत घरेलु कामगारांना सन्मानधन योजनेअंतर्गत प्रत्येकी रू १०००० आमआदमी विमा योजनेतर्गत देण्यात येणारे लाभ :-

१)लाभार्थीचा नैसर्गिक मुत्यु ओढवल्यास त्यांच्या वारसांस रु३००००

२)लाभार्थीचा अपघाती मुत्यु ओढवल्यास त्यांच्या वारसास रु ७५०००

३)लाभार्थीस अपघातमुळे कायम स्वरुपी संपुर्ण अपंगत्व आढलल्यास त्यास रु. ७५०००

४)लाभार्थीस अंशत: अपंगत्व आल्यास त्यास रु. ३७५००

लाभार्थीच्या मुलींच्या शिक्षणाकरीता शिक्षा सहयोग योजनांअतर्गत इयत्ता ९ ते १२ करीता आय.टी.आय कोर्स करीत असल्यास व दर वर्षी उत्तीर्ण असल्यास पाल्यांस दर तिमाही रू. ३०० इतकी रक्कम प्रत्येकी दिली जाते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पोलीस स्टेशन देऊळगावराजा ( जि.बुलढाणा) चे विभाजन करून पोलीस दूरक्षेत्र दे.महि नविन पोलीस स्टेशन मंजूर करणेबाबत**

**(३७) १२२२९० (२५-०७-२०१८). डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पोलीस स्टेशन देऊळगावराजा ( जि.बुलढाणा) चे विभाजन करून पोलीस दूरक्षेत्र हे महि नविन पोलीस स्टेशन मंजूर करणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीनी दिनांक ७ फेब्रुवारी, २०१८ रोजी वा त्या सुमारास मा.गृहराज्य मंत्री ( ग्रामीण), महाराष्ट्र राज्य यांना लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निवेदनानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०३-११-२०१८) :**(१) व (२) होय, हे खरे आहे. पोलीस स्टेशन देऊळगांव राजा बुलढाणाचे विभाजन करून पोलीस दुरक्षेत्र हे महि नवीन पोलीस स्टेशन मंजूर करणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीनी दिनांक ७ फेब्रुवारी २०१८ रोजी वा त्यासुमारास मा.गृहराज्य मंत्री (ग्रामीण),महाराष्ट्र राज्य यांना निवेदन दिले आहे. सदर निवेदनास अनुसरून पोलीस अधीक्षक ,बुलढाणा यांचेकडून पोलीस महासंचालक कार्यालयाने मागविलेला अहवाल शासनास अद्याप अप्राप्त आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईमध्ये वाहन चोरीचे वाढते प्रमाण

**(३८) १२२४८८ (३०-०७-२०१८). श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईमध्ये गत दोन वर्षात सहा हजारांहून अधिक वाहनांची चोरी झाली असून ही संख्या पहाता शहरातून दररोज सरासरी आठ वाहने चोरी जात असल्याचे दिनांक २४ मार्च, २०१८ रोजी वा त्यासुमारास आढळून आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याहून गंभीर बाब म्हणजे या चोरीला गेलेल्या सहा हजार वाहनांपैकी केवळ १८०० वाहनांचा शोध लावण्यात आला असून उर्वरित वाहनांचा शोध घेण्याबाबत शासनाला अपयश आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वाहनचोरी रोखण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-११-२०१८) :**(१) व (२) बृहन्मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या अधिपत्याखालील विविध पोलीस ठाण्यात सन २०१६ व २०१७ या दोन वर्षाच्या कालावधीत चोरीस गेलेल्या वाहनांची संख्या ६१५१ इतकी असून त्यापैकी सापडलेल्या वाहनांची संख्या २०२६ इतकी आहे.

(३) बृहन्मुंबईतील सर्व पोलीस ठाण्याच्या हद्दीत नाकाबंदी व कोंबिंग ऑपरेशन तसेच एम.व्ही. सीझर याचे वेळोवेळी आयोजन करण्यात येवून वाहनांची तसेच संशयीत इसमांची तपासणी केली जाते. शहरातील गर्दीच्या ठिकाणी पार्किग, ब्रीज खालील पार्कींग, मॉल इत्यादी ठिकाणाच्या पार्किग मध्ये पोलीस अधिकारी व अंमलदार हे गस्तीच्या दरम्यान वाहनांची तपासणी करतात. मोटार वाहन चोरी करणाऱ्या अभिलेखावरील गुन्हेगारांची तसेच संशयीत गुन्हेगार यांची राहती निवासस्थाने, छुपे अड्डे यांची नियमित तपासणी करुन मोटार वाहन चोरीच्य गुन्ह्यांना आळा घालण्याबाबत सातत्याने प्रयत्न करण्यात येत आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**प्रभादेवी (मुंबई) येथील एसआरएच्या सदनिका देण्याचे आमिष दाखवून एका व्यक्तीची लाखो रुपयांची फसवणुक केल्याबाबत**

**(३९) १२२६८४ (३०-०७-२०१८). श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) प्रभादेवी (मुंबई) येथे स्टॅण्डर्ड मिल एसआरएच्या बांधकाम पूर्ण झालेल्या २२ माजली इमारतीमधील एक सदनिका रुपये २४ लाखांमध्ये मिळवून देतो असे आमिष दाखवून खारदांडा परिसरात राहत असलेले श्री. संतोष जाधव यांची काही जणांनी फसवणूक केली असल्याची बाब दिनांक ११ मे, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी दादर पोलीस ठाणे येथे तक्रार दाखल करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करून दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-११-२०१८) :**(१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) फिर्यादी यांचेकडून २० लाख रक्कम घेवून त्यांना घर मिळवून न देता त्यांची फसवणूक केल्याप्रकरणी चार आरोपींविरुध्द दादर पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. ८८/१८, भा.दं.वि. कलम ४२०, ३४ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

दाखल गुन्ह्यातील आरोपीत व फिर्यादी यांचेमध्ये आपसी समझोत्याने एफआयआर रद्द करण्याकरिता मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे रिटयाचिका दाखल केले असून त्याबाबत सुनावणी सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पनवेल (जि.रायगड) शहरातील अल्पवयीन मुलींवर झालेला अत्याचार**

**(४०) १२२८३७ (२६-०७-२०१८). डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पनवेल (जि. रायगड) शहरामध्ये एका १४ वर्षाच्या अल्पवयीन मुलींवर श्री.राघवेंद्र गुप्ता या ३० वर्षीय व्यक्तीने अत्याचार केल्याचे दिनांक ३१ जानेवारी, २०१८ रोजी वा त्या सुमारास उघडकीस आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याच शहरातील दुसऱ्या घटनेत एका अल्पवयीन मूलीवर प्रेमसंबंधातून श्री.जीवन बनसोडे यांने अत्याचार केल्याचे दिनांक ३१ जानेवारी, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या दोन्ही प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व तद्नुसार दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-११-२०१८) :**(१) होय, हे खरे आहे.
सदर घटना दि. २३/०१/२०१८ ते दि. २४/०१/२०१८ या कालावधीत घडलेली आहे.
(२) होय, हे खरे आहे.
सदर घटना दि. २८/०१/२०१८ रोजी घडलेली आहे.
(३) घटना क्र. १ :- सदरबाबत फिर्यादीने दिलेल्या तक्रारीनुसार नवी मुंबई पोलीस आयुक्तालय अंतर्गत पनवेल शहर पोलीस ठाणे येथे गु.र.नं. ४६/२०१८ भा.दं.वि. कलम ३७६ (२) (एन), ५०६ सह लैंगिक अपराधापासून बालकांचे संरक्षण अधिनियम- २०१२ चे कलम ५ (एल) ए, ६ सह अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती अत्याचार प्रतिबंधक कायदा १९८९ चे कलम ३ (१), (डब्ल्यू), (१), ३(२) (व्ही) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून सदर गुन्ह्यातील आरोपीस अटक करण्यात आली. सध्या आरोपी हा जामिनावर मुक्त आहे. मा. न्यायालयात आरोपीविरूध्द दोषारोपपत्र दाखल करण्यात आले असून सदर गुन्हा न्यायप्रविष्ठ आहे.
घटना क्र. २ :- सदरबाबत फिर्यादीने दिलेल्या तक्रारीनुसार नवी मुंबई पोलीस आयुक्तालय अंतर्गत पनवेल शहर पोलीस ठाणे येथे गु.र.नं. ४८/२०१८ भा.दं.वि. कलम ३६३, ३७६, ३६६ (ए), ३७६(२) (आय) सह लैंगिक अपराधापासून बालकांचे संरक्षण अधिनियम- २०१२ चे कलम ४, ६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून सदर गुन्ह्यातील आरोपीस अटक करण्यात आली. सध्या आरोपी हा जामिनावर मुक्त आहे. मा. न्यायालयात आरोपीविरूध्द दोषारोपपत्र दाखल करण्यात आले असून सदर गुन्हा न्यायप्रविष्ठ आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## येणेरे (ता.जुन्नर,जि.पुणे) येथिल इंडियन इंग्लिश मिडियम स्कूल मधील शिक्षकानी विद्यार्थीनीचा केलेला विनयभंग

**(४१) १२२८३८ (३०-०७-२०१८). डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) येणेरे (ता.जुन्नर,जि.पुणे) येथिल इंडियन इंग्लिश मिडियम स्कूल मधील विद्यार्थीनीला बाथरुमध्ये बोलावून शिक्षकांनी विद्यार्थीनीसोबत अश्लील चाळे केल्याचा संतापजनक प्रकार दिनांक २९ जानेवारी, २०१८ रोजी उघडकीस आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी संचालकासह दोन शिक्षकांवर जुन्नर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधीत दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-११-२०१८)** :(१) होय हे खरे आहे.
(२) सदर प्रकरणी संस्थापक आरोपी याचे विरूध्द जुन्नर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
(३) फिर्यादीने दिलेल्या तक्रारीवरून जुन्नर पोलीस स्टेशन येथे गु. र. नं. १९/२०१८ भा.द. वि. कलम ३७६, ३५४(अ),५०६ बाल लैंगिक अत्याचार कायदा २०१२ चे कलम ४,६,८, १२ अनुसूचित जाती व जमाती अत्याचार प्रतिबंध २०१५ चे कलम ३(१), (W), १, ३((२) (VA) प्रमाणे आरोपीविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर गुन्ह्यातील आरोपीस अटक करण्यात आली असून सध्या आरोपी हा येरवडा मध्यवर्ती कारागृह, पुणे येथे न्यायालयीन कोठडीमध्ये आहे. सदर गुन्ह्यामध्ये आरोपी विरूध्द मा. न्यायालयामध्ये दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे. सद्यस्थितीत सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## हिंदुस्थान युनिलिव्हर कंपनीच्या बोगस सौंदर्य प्रसाधनाची होत असलेली विक्री

**(४२) १२३२७९ (२६-०७-२०१८). श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हिंदुस्थान युनिलिव्हर कंपनीच्या बोगस सौंदर्य प्रसाधनाची विक्री करुन कंपनीची फसवणूक केल्याप्रकरणी मुंबई पोलीसांच्या गुन्हे शाखेने एका टोळीला अटक केल्याची घटना दिनांक २० मे, २०१८ रोजी वा त्या सुमारास घडली हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त घटनेची शासनातर्फे चौकशी करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले आहे व ताब्यात घेतलेल्या व्यक्तींकडून अन्य कोणकोणत्या कंपन्यांची फसवणूक केल्याचे उघड झाले आहे व त्या अनुषंगाने पुढे कोणती कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-११-२०१८)** :(१) (२) व (३) होय,

हिंदुस्थान युनिलिव्हर कंपनीने मुंबई उच्च न्यायालय येथे Notice of motion (L) No. ४७७/२०१८ in comm.suit (L) २७५/२०१८ अन्वये दाखल केलेल्या दिवाणी दाव्याच्या अनुषंगाने कोर्ट रिसीव्हर व हिदुस्थान युनिलिव्हर कंपनीचे कर्मचारी यांनी ७ पैकी ५ ठिकाणी छापे टाकले असता निरनिराळे सौदर्य प्रसाधने व बनावटीकरणाकरीता लागणारे साहित्य/वस्तु ताब्यात घेऊन साहित्य सिल करुन ठेवले आहे.

सदर प्रकरणी हिंदुस्थान युनिलिव्हर कंपनीच्या प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने कंपनीची फसवणूक केल्याप्रकरणी गु.प्र.शा, गु.र.क्र. ३१/२०१८ कलम ४२०, ४६७, ४६८, ४७१, ३४ भादवि सह कलम ५१, ६३, ६५ कॉपी राईट ॲक्ट सह कलम १०३, १०४ ट्रेडमार्क ॲक्ट (शिवडी

पोलीस ठाणे गु.र.क्र. ५८/१(८) अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असून अद्यापपावेतो एकूण १७ आरोपींना अटक करण्यात आली आहे.

सदर गुन्हा तपासाधिन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**उदगीर (जि.लातूर) येथे नविन वाढीव पोलीस वसाहतीसाठी निधी उपलब्ध करून देण्याबाबत**

**(४३) १२३६५८ (२६-०७-२०१८). डॉ.सुधाकर भालेराव (उदगीर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उदगीर (जि.लातूर) तालुक्यात शहर व ग्रामीण पोलीस कर्मचा-यांना अपु-या असलेल्या वसाहतीमुळे राहण्याची गैरसोय होत असल्याचे माहे मे, २०१८ च्या दुस-या आठवड्यामध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उदगीर पोलीस विभागाकडे ५ एकर जमीन असून त्याठिकाणी नविन वाढीव पोलीस वसाहतीचा प्रस्ताव शासनाकडे निधीसाठी प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उदगीर येथे नविन वाढीव पोलीस वसाहतीसाठी निधी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-११-२०१८) :**(१) हे खरे आहे.

(२) व (३) पोलीस स्टेशन उदगीर, जि. लातूर येथील पोलीस अधिकारी व कर्मचा-यांसाठी निवासस्थाने अपुरी व खूप जुनी असल्याने ती पाडून त्या ठिकाणी नवीन निवासस्थाने बांधण्यासाठी रु. ३९०९.०६ लक्ष इतक्या रकमेचा प्रस्ताव १४ व्या वित्त आयोगांतर्गत प्रशासकीय मान्यता व निधी मिळण्यासाठी प्राप्त झाला होता. तथापि, केंद्र शासनाकडून निधी मिळत नसल्याने सदर प्रस्ताव १४ व्या वित्त आयोगातून वगळून सन २०१७-१८ च्या दरसूचीवर नव्याने तयार करण्याबाबत पोलीस अधीक्षक, लातूर यांना कळविले होते. त्यानुसार अद्यावत दरसूचीवर असलेला प्रस्ताव महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ मर्यादित, मुंबई यांना पाठविला असून उदगीर (जि. लातूर) येथे नवीन निवासस्थान बांधकामासाठी मे. गार्गी एन्टरप्रायझेस यांची प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून नेमणूक करण्यात आली आहे. सदर कामाचे सविस्तर नकाशे व प्रस्ताव तयार करण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कवठेमहांकाळ (जि.सांगली) येथील पवनचक्क्यांवरील सुरक्षा रक्षकांच्या काम बंद आंदोलनाबाबत**

**(४४) १२३८८५ (३०-०७-२०१८). श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कवठेमहांकाळ (जि.सांगली) येथील पवनचक्क्यांवर सुरक्षा रक्षकांची कामे करणा-या २०० सुरक्षा रक्षकांनी काम बंद आंदोलन माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान पासुन केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त सुरक्षारक्षकांनी तनिष एंटरप्रायझेस या सुरक्षा रक्षक पुरविणा-या कंपनीचा ठेका सुझलॉन एनर्जी लि.या कंपनीने त्वरीत रद्द करावा अशी मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, भूमीपुत्रांना रोजगारापासून वंचित ठेवणा-या तनिष एंटरप्रायझेस या कंपनीविरुध्द निषेध करण्यात आला आहे , हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

व तद्नुसार, शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (१२-११-२०१८) :**(१) अंशत: खरे आहे.

सदर सुरक्षा रक्षकांनी काम बंद आंदोलन केलेले होते. तथापि, संबंधित एजन्सीने त्यांना पूर्ववत कामावर घेतल्यानंतर काम पूर्ववत सुरु झालेले आहे.

(२) व (३) हे खरे नाही.

(४) होय. सांगली जिल्हा सुरक्षा मंडळाकडून चौकशी करण्यात आली आहे.

सांगली जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळाच्या कार्यक्षेत्रात सुझलॉन एनर्जी लि. ही कंपनी कार्यरत असून कंपनीच्या जिल्हयातील विविध ठिकाणी असलेल्या पवनचक्क्या रक्षणाची सुरक्षा रक्षक एजन्सी मार्फत नेमलेल्या सुरक्षा रक्षकांना कामावरुन कमी केलेल्या नोटीस दिल्याने असंतोष निर्माण झाल्याने बहुतांश सुरक्षा रक्षकांनी काम बंद केले होते. तथापि, संबंधित एजन्सीने चर्चेअंती सर्व सुरक्षा रक्षक यांना कामावर सामावून घेतले आहे.

सुझलॉन एनर्जी लि. या कंपनीकडील ठेकेदाराचे बाबतीत तक्रारीच्या अनुषंगाने दखल घेण्यात आली आहे. मुख्य मालक म्हणून सुझलॉन एनर्जी लि. या कंपनीवरती अधिनियम व योजनेतील तरतूदीचे अनुपालन न केल्याने मा.न्यायाधीश, प्रथम वर्ग न्यायालय कवठेमहाकाळ या ठिकाणी खटला क्र.६२३/२०१५ नुसार खटला दाखल करणेत आलेला आहे. सदर खटला न्यायप्रविष्ठ आहे.

सुझलॉन एनर्जी लि. या आस्थापनेकडील कार्यरत ठेकेदार/एजन्सी यांना सांगली सुरक्षा रक्षक मंडळाकडून महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक (नोकरीचे नियमन व कल्याण ) अधिनियम,१९८१ च्या कलम २३ अंतर्गत सूट मिळण्यास प्रस्ताव न दाखल करणे व नोंदणी न केल्याबाबत विशेष पोलीस महानिरिक्षक, कोल्हापूर यांना दि.०७/०७/२०१८ रोजीच्या पत्राने सूचित करण्यात आले आहे. सदर कार्यालयाचे यासंदर्भात पोलीस अधीक्षक सांगली व सातारा

यांना दि.०४/०७/२०१८ रोजीच्या पत्रान्वये आवश्यक कार्यवाही करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत. तसेच विशेष पोलीस महानिरिक्षक यांना महाराष्ट्र खाजगी सुरक्षा अभिकरण (नियमन) २००५ अन्वये आवश्यक ती कार्यवाही करुन अहवाल सादर करण्याबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सेलू (जि.परभणी) येथील न्यायालयीन इमारत मोडकळीस आल्याबाबत**

**(४५) १२४०६२ (२६-०७-२०१८). श्री.विजय भांबळे (जिंतूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सेलू (जि.परभणी) येथील न्यायालयीन इमारतीची निर्मिती ही निजाम काळातील असल्याने ती मोडकळीस आली असून जीवितास धोका निर्माण झाला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने पाहणी करून सदरहू न्यायालयाची नूतन इमारत निर्मितीबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-११-२०१८) :**

(१) अंशत: खरे आहे. सेलू, जि.परभणी येथील न्यायालयीन इमारत निजामकालीन असून, सन १९४० मध्ये बांधण्यात आली आहे. सदर इमारतीचे आर्युमान संपले असल्याबाबतचा अहवाल उप विभागीय अधिकारी, सार्वजनिक बांधकाम उप विभाग, सेलू यांनी दिलेला आहे. परंतु सद्य:स्थितीत सदर इमारतीमध्ये न्यायालयीन कामकाज सुरु आहे.
(२) प्रमुख जिल्हा न्यायाधीश, परभणी यांनी सेलू, जि.परभणी येथे नव्याने बांधण्यात येणाऱ्या न्यायालयीन इमारतीचा आराखडा, नकाशा व अंदाजपत्रक मान्यतेसाठी दि.२६ मार्च २०१८ रोजी मा.उच्च न्यायालय, मुंबई यांना सादर केलेले आहे. सदर प्रस्ताव मा.उच्च न्यायालय, मुंबई यांच्याकडून प्राप्त झाल्यानंतर आवश्यक कार्यवाही करण्यात येईल.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**आंबा (ता.शाहुवाडी जि.कोल्हापूर) येथे कायमस्वरूपी पोलीस चौकी स्थापन करण्याबाबत**

**(४६) १२४२८२ (३०-०७-२०१८). श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आंबा (ता.शाहुवाडी जि.कोल्हापूर) परिसरात बारा महिने पर्यटकांची गर्दी असते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आंबा पासून २२ किमी अंतरावर शाहुवाडी पोलीस ठाणे असल्याने काही घटना घडल्यास पोलीसांना धावाधाव करावी लागते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर परिसर निसर्ग संपन्नतेने भरपूर असून, घनदाट झाडी व जंगल असल्याने हुल्लडबाज पर्यटकांमध्ये वादावादी व हाणामारीच्या घटना सातत्याने घडत असतात तसेच घातपात किंवा खुनाचे पुरावे नष्ट करण्यासाठी या भागाचा जास्त वापर केला जातो, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, आंबा येथे कायमस्वरूपी पोलीस चौकी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०३-११-२०१८) :**(१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) आंबा,ता.शाहुवाडी येथे हुल्लडबाज पर्यटकामध्ये वादावादी व हाणामारीच्या घटना घडल्याबाबत शाहुवाडी पोलीस ठाणे अभिलेखावर कोणतीही नोंद नाही. परंतु सन २०१६ ते सन २०१८ माहे मे अखेर कालावधीमध्ये ३ बेवारस मयतांची नोंद पोलीस ठाणे अभिलेखावर आहे.

(४) आंबा येथील पोलीस चौकीची पडझड झाल्याने तेथील कामकाज शाहुवाडी पोलीस ठाणे येथून होत आहे. सदरची चौकी दुरूस्त करणेबाबत तसेच पोलीस चौकीसाठी पर्यायी जागा भाडेतत्वावर घेण्याबाबतची बाब विचाराधीन आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### दौंड तालुक्यातील (जि. पुणे) औद्योगिक क्षेत्रातील कंपन्यांमध्ये माथाडी कामगार कायद्याचे उल्लंघन होत असल्याबाबत

**(४७) १२५६३७ (३०-०७-२०१८). श्री.राहूल कुल (दौंड), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दौंड तालुक्यात (जि. पुणे) कुरकुंभ, पांढरेवाडी, सहजपूर, नांदूर, भांडगाव या परिसरातील औद्योगिक क्षेत्रामध्ये मोठ्या प्रमाणावर कंत्राटी कामगारांची भरती केली असून त्यामध्ये परप्रांतीय कामगार काम करीत असल्याने माथाडी कामगार कायद्याचे उल्लंघन होत असल्याचे माहे फेब्रुवारी - मार्च, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नागरिकांनी याबाबत अनेक वेळा तक्रारी केल्या असून कंपनीमध्ये घडलेल्या अपघातामध्ये अनेक कामगारांना जीव देखील गमवावा लागला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कंपनीकडून कामगारांना कोणत्याही प्रकारचे सुरक्षा उपकरणे दिली जात नसल्याचे देखील माहे मार्च -एप्रिल २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, कामगार कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या कंपन्यांवर तसेच कामगारांच्या सुरक्षेची जबाबदारी न घेणाऱ्या कंपनी चालकांवर कोणती कारवाई करण्यात आली वा
येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (१२-११-२०१८) :**

(१) होय, हे अंशतः खरे आहे.

दौंड तालुक्यातील औद्योगिक परिसरातील ४७ आस्थापना मंडळात नोंदीत असून,आस्थापनांचे काम करणारे ४१३ माथाडी कामगार देखील मंडळात नोंदीत आहेत. सदर परिसरात मोठया प्रमाणात औद्योगिक क्षेत्र असून जानेवारी,२०१६ ते मार्च,२०१८ या कालावधीत मंडळाच्या निरिक्षकांनी भेटी दिलेल्या आहेत. त्यामध्ये परप्रांतीय कामगार काम करीत असून माथाडी कामगार कायदयाचे उल्लंघन होत असल्याचे आढळून आल्यामुळे नोंदणी होण्याकरिता कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आलेली आहे. त्यापैकी ६ मालक आस्थापना मंडळात नोंदीत झाले आणि त्यातील २९ माथाडी कामगारांची देखील मंडळाने नोंदणी केलेली आहे.

(२),(३),व (४) औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयाकडे नागरिकांकडून याबाबत कोणत्याही तक्रारी प्राप्त झालेल्या नाहीत. तथापि, सन-२०१६,२०१७ व २०१८ मध्ये दौंड तालुक्यातील नोंदणीकृत ६ कारखान्यांमध्ये घडलेल्या अपघातांमध्ये ९ कामगारांना आपला जीव गमवावा लागला.

दि.३१/०१/२०१८ रोजी मिनाक्षी फेरो इंगॉटस प्रा.लि.,पुणे या कारखान्यात झालेल्या अपघाताच्या चौकशी दरम्यान कामगारांना वैयक्तिक सुरक्षा साधने पुरविली नसल्याचे निदर्शनास आले.

दौंड तालुक्यातील कारखाने अधिनियमांतर्गत वर नमूद नोंदणीकृत ६ कारखान्यांविरुध्द कारखाने अधिनियम १९४८ अंतर्गत खटले दाखल करण्यात आले असून क्लीन सायन्स अ‍ॅड टेक्नॉलॉजिस प्रा.लि.,पुणे, इटरनिस फाईन केमिकल्स लि., पुणे इटरनिस फाईन केमिकल्स लि.,पुणे यांचेविरुध्दचे खटले अनुक्रमे २२/०९/२०१६,१२/०६/२०१६ व१६-०२-२०१७ रोजी निकाली निघाले आहेत. अल्काईल अमाईन्स केमिकल्स लि., पुणे पारेख फुड अँड ऑईल लि.पुणे व मिनाक्षी फेरो इंगॉटस प्रा.लि.पुणे यांचेविरुध्दचे खटले न्यायप्रविष्ठ आहेत.

मिनाक्षी फेरो इंगॉटस या कारखान्यविरुध्द कारखाने अधिनियम १९४८ चे कलम २९(१) (a) (ii), कलम २९ (१)(b),कलम ७ व (२) (a),कलम ७ व (२) (b), कलम ६२ (१) व कलम ६१(१) च्या भंगाबाबत मा.मुख्य न्यायदंडाधिकारी, पुणे यांचे न्यायालयात खटले (क्र.२०८६१ व २०८६२ ) दाखल करण्यात आले असून ते न्यायप्रविष्ट आहेत. तसेच कारखाने अधिनियम १९४८ चे कलम ४०(२) अंतर्गत आदेश पारित करण्यात आले आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**दौंड तालुक्यातील (जि.पुणे) दौंड व यवत पोलीस स्टेशनच्या इमारतींच्या बांधकामासाठी निधी मिळणेबाबत**

**(४८) १२५६४० (३०-०७-२०१८). श्री.राहूल कुल (दौंड), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दौंड तालुक्यातील (जि. पुणे) दौंड व यवत पोलीस स्टेशनच्या इमारती पुरेशा नसून नवीन बांधकामासाठी निधी मिळण्याची विनंती मा. लोकप्रतीनिधी यांनी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निधी मिळणेबाबत व सदर इमारतींचे बांधकाम करण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-११-२०१८) :**

(१) हे खरे आहे.

(२) दौंड तालुक्यातील दौंड व यवत पोलीस ठाण्याच्या प्रशासकीय इमारती बांधकामाबाबतचा प्रस्ताव पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण कार्यालयाकडून प्राप्त झालेला नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वाकडी (जि.जळगाव) गावातील विहिरीत आंघोळ करणाऱ्या मातंग समाजातील मुलांची शेत मालक व त्याच्या नोकराने काढलेली धिंड**

**(४९) १२६२६१ (०३-०८-२०१८). श्री.इम्तीयाज सय्यद (औरंगाबाद मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाकडी (जि.जळगाव) गावातील श्री. ईश्वर जोशी यांच्या शेतातील विहिरीत आंघोळ करणाऱ्या मातंग समाजातील मुलांना किरकोळ कारणावरून दिनांक १० जून २०१८ रोजी वा त्या सुमारास शेत मालक व त्याच्या नोकराने अमानुष मारहाण करत नग्न करून त्यांची धिंड काढण्यात आल्याची गंभीर घटना घडली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील घटनेमधील संबंधित दोषींविरोधात शासनामार्फत अद्यापपर्यंत कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(३) तसेच, अशा जातीयवादी घटनांना पायबंद घालण्यासाठी शासनामार्फत धोरणात्मक निर्णय घेऊन कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-११-२०१८) :**(१) नमूद घटनेतील पिडीत मुलांना त्यांचे कपडे काढून अमानुषपणे मारहाण व जातीवाचक शिवीगाळ करण्यात आली आहे. त्यांची धिंड काढण्यात आलेली नाही.

(२) फिर्यादीने दिलेल्या तक्रारीनुसार पहुर पोलीस ठाणे, ता. जामनेर, जि. जळगांव येथे भाग-५ गु.र.नं. ४६/२०१८ भा.दं.वि. कलम ३२४, ५०४, ५०६, ३४ सह बालकांचे लैंगिक अपराधापासून संरक्षण अधिनियम २०१२ चे कलम ११ (२), १२,१६ (A),१,२,३ व १७ सह अनुसुचित जाती व जमाती अत्याचार प्रतिबंधक कायदा कलम ३ (१), (ड) (ई) (आर),(एस) सह आय.टी. ॲक्ट कलम ६७, ६७ (ब) गुन्ह्यात भादंवि २०१ वाढीव कलम समाविष्ट करून आरोपीतांविरूध्द गुन्हा दाखल करण्यात येवून आरोपींना अटक करण्यात आली. आरोपीतांविरूध्द मा. न्यायालयात दोषारोप पत्र सादर केले असून सद्यस्थितीत सदर गुन्हा न्यायप्रविष्ठ आहे.

(३) अशा घटनांची पुनरावृत्ती होवू नये तसेच जातीय वादी घटनांना पायबंद बसावा याकामी जिल्हा घटकातील पोलीस स्टेशन प्रभारी अधिकारी, पोलीस अधिकारी व उपविभागीय पोलिस अधिकारी माध्यमातून जास्तीत जास्त प्रमाणात गावभेटी करणे, गावागावांत मिटींग आयोजित करुन उपस्थित गावकरी व नागरीकांना मार्गदर्शन करणे, तसेच अनुसुचित जाती जमातीतींल नागरीकांना सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून आवश्यक मदत सह उपाययोजना राबविण्याबाबत कामकाज करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**श्रीमलंग (ता.अंबरनाथ, जि. ठाणे) विभागामध्ये नेवाळी येथे**
**नविन पोलीस स्टेशन उभारण्याबाबत**

**(५०) १२६३४३ (०४-०८-२०१८). श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्रीमलंग (ता.अंबरनाथ, जि. ठाणे) विभागामध्ये लोकवस्ती मोठ्या प्रमाणात वाढत असुन या भागात चोरी, खुन व लुटमारीचे प्रकार मोठ्या प्रमाणात वाढत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या भागात जवळपास पोलीस स्टेशन नसल्याने नागरीकांना तक्रार करण्यासाठी दुरचा पल्ला गाठावा लागतो, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नेवाळी येथे नविन सुसज्य पोलीस स्टेशन उभारण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीकडुन वारंवार मागणी केली जात आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, वाढत्या गुन्हेगारीला प्रतिबंध करण्यासाठी नेवाळी येथे नविन पोलीस स्टेशन सुरू करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-११-२०१८) :**(१) ठाणे पोलीस आयुक्तालयांतर्गत पोलीस उप आयुक्त परिमंडळ-४, उल्हासनगर मधील हिललाईन पोलीस स्टेशनच्या हद्दीमध्ये शहरीभाग वगळता अंबरनाथ तालुक्यातील एकूण २३ गावे असून हाजीमलंग पहाड येथे दर्गा हे धार्मीक स्थळ आहे. त्याठिकाणी देश/परदेशातून सर्वधार्मीय लाखो भाविक दर्शनासाठी ये-जा करीता असतात.

सदर भागात पुर्वीपेक्षा अधिक लोक राहत असून दाखल गुन्ह्यांच्या संख्येमध्ये वाढ झाल्याचे दिसून येत आहे.
(२) व (३) होय, हे खरे आहे.
(४) नवीन पोलीस ठाणे निर्माण करण्याबाबतचा प्रस्ताव अद्याप शासनास सादर झालेला नाही. प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर यावर यथोचित कार्यवाही करण्यात येईल
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.